| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक २५५ वा | बुधवार दिनांक २४ डिसेंबर, २०२५ | पृष्ठ ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## ऊर्स पूर्वतयारीचा आढावा

# दरवर्षीप्रमाणे यावर्षीही ऊर्स सर्वांच्या सहकार्याने व उत्साहाने साजरा करा-जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार

धाराशिव (जिमाका)- हजरत ख्वाजा शमशोद्दीन गाझी रहे यांचा उर्जा साजरा करण्याचे हे ७२१ वे वर्ष आहे.या उर्समध्ये हिंदू मुस्लिमसह सर्व धर्मांचे भाविक विविध राज्यातून मोठ्या संख्येने ऊर्स साजरा करण्यासाठी एकत्र येतात. हा उर्स एक एकात्मतेचे प्रतीक आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी ऊर्स सर्वांच्या सहकार्याने व उत्साहाने साजरा करावा.असे आवाहन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात ऊर्स पूर्वतयारीचा आढावा घेताना जिल्हाधिकारी श्री.पुजार बोलत होते.यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक रितू खोखर,सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता शिवराम केत,अन्न व औषध प्रशासनचे सहायक आयुक्त प्रदीप कुटे,उपप्रादेशिक परिवहन अधिकारी हर्षल डाके,सहायक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.मनीषा बांगर मुख्याधिकारी श्रीमती. अंधारे तहसीलदार मृणाल जाधव,जिल्हा वक्फ अधिकारी श्री.आमेर,एसटी आगारप्रमुख बालाजी भांगे, महावितरणचे पी.वाय.निकम यांचेसह उर्स आयोजन समितीचे ड.काझी परवेझ अहमद,इरफान कुरेशी, मोईनुद्दीन पठाण व फिरोज पठाण यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

श्री.पुजार म्हणाले की,नगरपरिषदेने ऊर्सच्या परिसरात स्वच्छता कायम ठेवावी.मोकाट जनावरांचा बंदोबस्त करावा.अग्निशमन व्यवस्था या काळात कायम तैनात ठेवावी.वीज भारनियमन या काळात करू नये. महावितरणने आपले तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या सेवा या काळात उपलब्ध करून द्याव्यात.अन्न व औषध प्रशासनाने ऊर्समध्ये लावण्यात येणाऱ्या विविध खाद्यपदार्थांच्या स्टॉलची तपासणी करावी.ऊर्समधील रस्त्यांचे पथदिवे रात्रीला पूर्ण सुरू राहतील याची खात्री करावी. रस्त्याची आवश्यक दुरुस्ती सार्वजनिक बांधकाम विभागाने करावी.परिसरात धूळ उडणार नाही यासाठी नगरपरिषदेने ऊर्सच्या रस्त्यांवर पाणी मारावे. ऊर्स परिसरात स्वच्छतेकडे लक्ष देऊन ऊर्ससाठी येणाऱ्या भाविकांची गैरसोयी टाळावी.असे त्यांनी यावेळी सांगितले.

श्रीमती खोखर म्हणाल्या की, संदल मिरवणुकीत डीजेचा वापर होणार नाही. वापर करणाऱ्या विरुद्ध कारवाई करण्यात येईल.संदल मिरवणुकीत पारंपारिक वाद्यांचा वापर करावा. कोणताही अनुचित प्रकार उर्स दरम्यान होऊ नये यासाठी येणे-जाण्याचा मार्ग प्रशस्त असावा. वाहतूक विस्कळीत होणार नाही यासाठी पोलीस काम करतील.




डॉ.श्रीमती बांगर यांनी यावेळी सांगितले की,ऊर्समध्ये आरोग्य पथक उपस्थित राहणार आहे.भाविकांची आरोग्य तपासणी या दरम्यान करण्यात येणार आहे. विविध स्टॉलवर असणाऱ्या पिण्याच्या पाण्याची ओटी चाचणी देखील करण्यात येणार आहे. एक रुग्णवाहिका देखील तैनात राहणार आहे.आवश्यक तेवढा औषध साठा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे त्या म्हणाल्या.

यावेळी उर्स आयोजन समितीच्या वतीने उर्स कालावधीत दर्गा परिसरात आतील व बाहेरील भागात साफसफाई करून कब्रस्तानातील काटेरी झाडे तोडण्यात यावी. अशी मागणी केली. रस्त्यांची साफसफाई, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, पोलवरील लाईट दुरुस्ती,संदल मिरवणुकीच्या मुख्य रस्त्यावरील नाल्याची साफसफाई करणे,रस्त्यांवर डीडीटी पावडर टाकणे, कब्रस्तानमधील पोलवर फोकस बसविणे, शहरातील मोकाट फिरणाऱ्या जनावरांचा बंदोबस्त करणे,ऊर्स दरम्यान साजरा करण्यात येणाऱ्या प्रत्येक कार्यक्रमात पोलीस बंदोबस्त ठेवण्याची व्यवस्था करणे, कव्वाली मैदानावर दर्ग्यामध्ये महिलांची मोठ्या प्रमाणात गर्दी असते,त्यामुळे महिला पोलीस बंदोबस्त करणे, स्टेजसमोर कव्वालीच्या वेळी पोलीस नियुक्त करणे,भाविकांची संख्या लक्षात घेता रोगराई पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही,त्यामुळे एक वैद्यकीय पथकसह म्बुलन्स व्यवस्था करणे, पिण्याच्या पाण्यावर तसेच खाद्यपदार्थावर तपासणी करण्यासाठी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे, भाविकांना ऊर्ससाठी येण्यासाठी राज्य परिवहन महामंडळाने जादा बसची व्यवस्था करणे, बाहेरगावावरून रेल्वेने येणाऱ्या भाविकांसाठी रेल्वे स्टेशन ते बसस्थानक ते दर्गा मार्गांपर्यंत ऊस काळापूर्ती बसेसची व्यवस्था करणे अशा विविध मागण्या यावेळी त्यांनी केल्या.

## क्राईम न्युज

### धाराशिव बसस्थानकामध्ये सोन्या-चांदी सह घड्याळाची केली चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- आनंदनगर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी शिला अविनाश रेणके, वय ५० वर्षे, रा. तडोळा ता. आळंद जि. गुलबर्गा या दि. २१.१२.२०२५ रोजी ११.४० वा. सु. धाराशिव बसस्थानक येथे भुम हैद्राबाद बस मध्ये चढत असताना शिला रेणके यांचे पर्स मधील सोन्या चांदीचे, घड्याळ असे एकुण ६०,००० किंमतीचा मुद्देमाल अज्ञात व्यक्तीने गर्दीचा फायदा घेवून चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-शिला रेणके यांनी दि.२२.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आनंदनगर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### धाराशिव येथून मोटारसायकलची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव शहर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी ज्ञानोबा कुंडलीक गोरे, वय ४० वर्षे, भवानी चौक बालाजी वजन काटा पाठीमागे धाराशिव ता. जि.धाराशिव यांची अंदाजे ३०,००० किंमतीची मोटरसायकल अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-ज्ञानोबा गोरे यांनी दि.२२.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव शहर पो ठाणे येथे अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### स्टार्टर,फ्युज व वायरची केली चोरी

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी संतोष बजरंग सोनवणे, वय ४८ वर्षे, रा. शिराढोण ता. तुळजापूर जि. धाराशिव यांचे शिराढोण शिवारातील शेत गट नं १९८ मधील स्टार्टर, तीन फ्युज, तांब्याचे वायर ३०० फुट असा एकुण २९,००० किंमतीचा माल दि.२०.१२.२०२५ रोजी १७.०० वा. सु. अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-संतोष सोनवणे यांनी दि.२२.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### अपघातात एकाचा मृत्यु

वाशी (प्रतिनिधी)-पोलीस ठाणे अंतर्गत मयत सुरज हरिशचंद्र तावरे, वय २२ वर्षे, रा.झिन्नर ता. वाशी जि. धाराशिव हे दि.१७.१२.२०२५ रोजी वाशी ते झिन्नर रोडवर उंदरे यांचे शेताजवळून पायी जात होते. दरम्यान ट्रॅक्टर क्र चा चालकाने त्याचे ताब्यातील ट्रॅक्टर चालवून सुरज तावरे यांना पाठीमागून धडक दिली. या अपघातात सुरज तावरे हे गंभीर जखमी होवून मयत झाले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-संगिता हरिशचंद्र तावरे, वय ४५ वर्षे, रा. झिन्नर ता. वाशी जि. धाराशिव यांनी दि.२२.१२.२०२५ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन वाशी पो ठाणे येथे भा.न्या.सं. कलम २८१, १०६ (१) सह १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# अण्णासाहेब पाटील महामंडळाबाबत दिशाभूल करणाऱ्या माहितीस न जुमानण्याचे आवाहन

धाराशिव (जिमाका )- अलीकडच्या कालावधीत काही समाजमाध्यमांद्वारे तसेच काही व्यक्तींमार्फत अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत सुरू असलेल्या कार्यवाहीबाबत अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती प्रसारित होत असल्याचे निदर्शनास आले आहे. यामुळे महामंडळाची बदनामी होत असून प्रामुख्याने मराठा समाजात तसेच जनसामान्यांमध्ये संभ्रम निर्माण होण्याची शक्यता आहे.

या पार्श्वभूमीवर वस्तुस्थिती मराठा समाजातील बांधवांपर्यंत तसेच राज्यातील सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासनामार्फत विविध शासकीय विभाग, महामंडळे व शासन अंगीकृत उपक्रमांसाठी अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाद्वारे तरतूद निश्चित करण्यात येते व ती विधीमंडळास सादर केली जाते.सदर अंदाजपत्रकास विधीमंडळाची मान्यता मिळाल्यानंतर त्याची अंमलबजावणी होत असते. अंदाजपत्रकातील वित्तीय मर्यादेत प्रत्येक शासकीय विभाग,महामंडळ तसेच शासन अंगीकृत उपक्रमांस वार्षिक इष्टांक (Targets) निश्चित करणे आवश्यक असते.

राज्यातील इतर आर्थिक विकास महामंडळांप्रमाणेच अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फतही वार्षिक इष्टांक निश्चितीची कार्यवाही करण्यात येत असून,त्या इष्टांकांच्या मर्यादेतच वित्तीय दायित्व निर्माण करणे हे नियमानुसार बंधनकारक आहे.

निवडणुकीच्या आदर्श आचारसंहितेमुळे अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत नवीन पात्रता प्रमाणपत्र (LOI) देण्याची कार्यवाही तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करण्यात आलेली आहे.याव्यतिरिक्त उर्वरित राज्यात पात्रता प्रमाणपत्र (LOI) देण्याची कार्यवाही नियमितपणे सुरू आहे.आदर्श आचारसंहितेचा कालावधी संपल्यानंतर व निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर वरील नमूद क्षेत्रांमध्ये पात्रता प्रमाणपत्र (LOI) देण्याची कार्यवाही नियमानुसार पूर्ववत सुरू करण्यात येईल.

महामंडळाविषयी प्रसारित होत असलेल्या कोणत्याही अफवा अथवा चुकीच्या माहितीवर मराठा बांधवांनी तसेच सर्वसामान्य नागरिकांनी विश्वास ठेवू नये.हे महामंडळ मराठा समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असून कार्यरत आहे,असे अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक,मुंबई यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

### लैंगीक अत्याचार: गुन्हा दाखल

परंडा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत एका गावातील २२ वर्ष मुलगी दि.२२.१२.२०२५ रोजी ती शेतात जनावरांना चारा पाणी करण्यासाठी गेली असता गावातील एका तरुणाने तिचे शेतात येवून तिच्यावर लैंगीक अत्याचार केला. शिवीगाळ करुन तुला कोठे जायचे आहे तेथे जा अशी धमकी दिली.अशा मजकुराच्या पिडीतेने दि.२२.१२.२०२५ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.न्या.सं.कलम-६४(१),३५२, ३५१ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

# लघुलेखक व लघुटंकलेखक पदासाठी माजी सैनिकांनी अर्ज करावे

धाराशिव दि.२२ डिसेंबर (जिमाका) सैनिक कल्याण विभाग,पुणे यांनी कळविले आहे की,कृषि विभाग,पुणे यांनी लघुलेखक (उच्च श्रेणी), लघुलेखक (निम्न श्रेणी) तसेच लघुटंकलेखक संवर्गातील पदे सरळसेवेने भरण्यासाठी जाहिरात प्रसिद्ध केली होती.

या भरती प्रक्रियेमध्ये माजी सैनिक प्रवर्गासाठी लघुलेखक व लघुटंकलेखक या पदांसाठी एकूण ७ पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्याने, कृषि विभाग,पुणे यांनी सैनिक कल्याण विभाग,पुणे यांच्याकडे 'ना हरकत प्रमाणपत्र' (छजउ) देण्याबाबत मागणी केली आहे.

त्या अनुषंगाने जिल्ह्यातील माजी सैनिक वरील पदांसाठी पात्र व उपलब्ध असल्यास त्यांनी आपले नाव जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय,धाराशिव येथे २४ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजेपर्यंत कळवावे. असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय,धाराशिव यांनी केले आहे.

# श्री साई जनविकास कृषी महाविद्यालयात इमार्टिकस कंपनीचा कॅम्पस प्लेसमेंट उपक्रम; आठ विद्यार्थ्यांची निवड



धाराशिव (प्रतिनिधी)- व्ही पी शैक्षणिक संकुलातील श्री साई जनविकास कृषी महाविद्यालयात नामांकित इमार्टिकस कंपनीकडून कॅम्पस प्लेसमेंटचे आयोजन करण्यात आले. या प्लेसमेंट प्रक्रियेत महाविद्यालयातील भक्ती सुरेश चौधरी, वैष्णवी रमेश वाघ, राजेश्वरी प्रभू जाधवर, राजश्री लक्ष्मीकांत पाठक, सौरभ हनुमंत मदने, प्रीती प्रवीण पाटील, शिवानी सुधीर गव्हाणे, आश्लेषा सुरेश गोरे या आठ विद्यार्थ्यांची यशस्वी निवड करण्यात आली.या सर्व निवड झालेल्या विद्यार्थ्यांचेअभिनंदन संस्थेचे अध्यक्ष डॉ.प्रतापसिंह पाटील व करण पाटील यांनी केले.

या प्रसंगी ज्ञानेश खोत (महाराष्ट्र हेड, इमार्टिकस कंपनी) यांनी विद्यार्थ्यांना करिअर संधी, उद्योगातील अपेक्षा व कौशल्यविकासाबाबत मार्गदर्शन केले. तर हेमंत जगताप (मॅनेजर, इमार्टिकस कंपनी) यांनी निवड प्रक्रियेंतर्गत विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. एम. आर. शेख यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. एच. पाटील होते. त्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना उद्योगविश्वाशी थेट संपर्क मिळतो व रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात, असे प्रतिपादन केले.

या कॅम्पस प्लेसमेंट उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला असून महाविद्यालयाच्या प्लेसमेंट उपक्रमांना सकारात्मक चालना मिळाली आहे. यावेळी महाविद्यालयाचे व्यवस्थापक प्रा. हरी घाडगे, डॉ. ए. ए. गांधले, प्रा. एस. एन. पाटील एन. ए. मुंढे, एम. टी. लोंढे व इतर प्राध्यापक उपस्थित होते.

# तुळजापूर येथील नवोदय विद्यालयात माजी विद्यार्थी आले एकत्र, रक्तदान, नेत्र तपासणीचे उपक्रम

तुळजापूर(प्रतिनिधी)- अरे-तुरेच्या हाका देणारे माजी विद्यार्थी कित्येक दिवसांनंतर भेटल्यानंतर प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद विलसत होता. शाळेतील आठवणी सांगत सर्वच जण दंग होते. या वेळी गुरुजनांचाही सन्मान करण्यात आला. जवाहर नवोदय विद्यालयात रक्तदान शिबिर, नेत्र तपासणी शिबिर आदी विविध उपक्रमांनी माजी विद्यार्थी स्नेहमेळावा उत्साहात संपन्न झाला. या वेळी माजी विद्यार्थ्यांनी विद्यालयाला विद्यार्थ्यांसाठी व्हॅन भेट देण्याचेआश्वासन दिले.

प्रारंभी माजी प्राचार्या डॉ. आशा दुबे यांचा हस्ते सरस्वती पूजन व दीपप्रज्वलाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या प्रसंगी विद्यालयाचे प्र. प्राचार्य डी. व्ही. बडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यानंतर विद्यालयाचे संगीत शिक्षक पुरूषोत्तम जोशी व सहकाऱ्यांनी स्वागत गीत गाऊन सर्वांचे स्वागत केले. यानंतर नवोदय चा माजी विद्यार्थ्यांनी आम्ही नवोदय हो ही प्रार्थना गाऊन जुन्या आठवणींना उजाळा दिला. यानंतर तत्कालीन शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविकात विद्यालयाचे प्र. प्राचार्य बडे यांनी सर्व माजी विद्यार्थ्यांचे स्वागत करून विद्यालयाचा प्रगतीचा आलेख माजी विद्यार्थ्यांच्या समोर मांडला. तर बाळासाहेब भोसले, डॉ. चैताली थोरात, लक्ष्मण सावस्कर, अतुल ढगे, तुषार वाघमारे, शामकुमार फुलसुंदर आदि माजी विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. या प्रसंगी रक्तदान शिबिर व नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन केले होते. यासाठी विधीतज्ञ अमोल गुंड यांनी पुढाकार घेतला. याप्रसंगी माजी विद्यार्थ्यांनी विद्यालयाला विद्यार्थ्यांसाठी व्हॅन भेट देण्याचेआश्वासन दिले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन हरी जाधव, सुजाता कराड, चक्रपाणि गोमारे यांनी केले. कार्यक्रमाला विद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

माजी विद्यार्थी डॉ. यादव यांच्या योग व आयुर्वेदिक ओळख पुस्तक प्रकाशन ज्ञानेश पाटील यांनी कविता गायन करून व विश्वनाथ माने यांनी पोवाडा गाऊन सर्वांच्या रक्तात वीरश्री निर्माण केली. माजी विद्यार्थी डॉ. रामेश्वर यादव यांच्या योग व आयुर्वेदिक ओळख या पुस्तकाचे प्रकाशन प्राचार्या डॉ. आशा दुबे यांच्या हस्ते करण्यात आले.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## विरोधकांना कमी जागा मिळविता आल्या

राज्यात भारतीय जनता पार्टीला नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकीत अधिक जागा मिळाल्या, त्यामुळे भाजपाचे वर्चस्व वाढणार आहे. विरोधकांना का अपयश आले. या बाबत कारणाचा शोध घेणे अपेक्षित आहे. एकट्या एकनाथ शिंदे यांनी ५२ जागेवर यश मिळविले तर उद्धव ठाकरे, शरद पवार व काँग्रेसचे संख्याबळ ५२ होते. त्यात ठाकरे बंधुंना आता शुन्यातून काम करावे लागणार आहे. जनतेच्या मनातील भावना ओळणारा खरा राजकिय नेता हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे हे होते, यांच्यानंतर जी कामगिरी ठाकरे परिवाराकडून होणे अपेक्षित होती ती दिसून आली नाही. जनतेच्या मनात शिवसेना म्हणजे उद्धव ठाकरे यांची शिवसेना ही हिंदुत्वादी नसून बेगडे प्रेम आहे असे यदाकदाचित वाटत असेल. कारण ही तसे आहे. सत्तेसाठी काँग्रेस व राष्ट्रवादी सोबत जाणे किती हानीकारण होऊ शकते हे आज कळले असेल किंवा नसेलही! कारण भारतीय मोठे हुशार आहेत. बोलत नाहीत. आता तर अंदाज काढणे अशक्य झाले आहे. कोणाच्या मनात काय आहे हे पुर्वी कळत होते. आता तर अशी स्थिती आहे की, निर्णय चुकला तर फटका बसला. उद्धव ठाकरे यांना परत उभारी घेण्यासाठी मोठ्या प्रयत्नाची गरज आहे, कारण ठाकरे दोन आहेत, एक राज व दुसरे उद्धव! दोघांच्या विचारात मोठा फरक होता म्हणून वेगळे होते. आज समोर कोणताही पर्याय नसल्याने एकत्र येत आहेत. तरी जनता स्विकारेल असे वाटत नाही. जनता विचारी आहे. कोणीही काही सांगितले तर त्याच्या पाठीशी जात नाही. नगरपरिषद व नगर पंचायतमध्ये मतदान झाले हे विचारपुर्वक झाले आहे. उदा. घ्यायचे झाले तर लातूर जिल्ह्यातील पाच ठिकाणापैकी चार ठिकाणी भाजपाला यश मिळाले, एका ठिकाणी औशामध्ये पुर्ण ताकद लावुन अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला यश मिळाले. एक मुस्लीम महिला विजयी होते ही बाब भाजपासाठी मोठी चपराक आहे. चार ठिकाणी मिळालेल्या यशापेक्षा औसाची जागा जाणे तेही विद्यमान आमदार भाजपाचे, मुख्यमंत्र्याच्या अगदी जवळचे असताना जागा जाते यावर चिंतन होणे अपेक्षित आहे. अशी कोणती जादू या ठिकाणी चालली की, भाजपाला अपयश आले. मुळात जनतेला पहिल्यांदा विकास हवा आहे. मराठी किंवा अन्य भावनिक मुद्दा हा तात्पुरता स्वरूपाचा आहे. जनतेसोबत किती आहात याचा विचार केला पाहिजे. काही ठिकाणी अपवाद जसे औसाची जागा येथे जी विरोधकांनी पायभरणी केली ती केवळ मते मिळविण्यासाठी केली. तालुकास्तरावर काय केले पाहिजे. पाण्याचे टँकर, अन्नधान्याची मदतीची पोते, रस्ते, नळास पाणी, वीजची व्यवस्था यापेक्षाही भावनिक आवाहन झाली जागा फिक्स! असे दिसून येते. आपल्या राज्यात विचार केला जात नाही. जनतेसोबत किती आहात व हवेत किती आहात यावर चिंतन होणे अपेक्षित आहे. वास्तविक आगामी काळात आमदारकीला धोका होऊ शकतो. ही एक धोक्याची घंटा आहे. विचार केला तर समजेल. मुळात महाराष्ट्रात भाजपाला यश मिळाले याचा अर्थ जनता खुपच समाधानी आहे असे नाही. राज्यात सक्षम असे विरोधी गट किंवा पक्ष नाही. जे चांगले व्यक्ती, वजनदार आहेत जसे पृथ्वीराज बाबा सारखे काही तरी बोलून आपल्याच पायावर दगड मारून घेतात. भाजपा नको तर जावे कोणाकडे? या सर्वात मोठी बाब आहे. पर्याय मजबुत नाही. पंतप्रधानकडे पाहुन मतदान करणाऱ्याची संख्या बरीच आहे. आज देशात जी परिस्थिती आहे. जसे पाकिस्तानचे वागणे, बांगला देशातील घटना, दिल्लीत सापडलेले सुशिक्षित अतिरेकी हे बरेच जनतेला सावध करणाऱ्या बाबी आहेत. मध्यंतरी हिंदुत्व दहशदवादी असा अपप्रचार केला याला यश आले नाही. उलट ठराविक समाजाचे मंडळी सापडली. हिंदुचे नाव हॉटेलला, व्यवसायिकाला देऊन व्यवसायिक सापडले. हातात लाल दोरा व डोक्यावर अष्टगंध लावणारी मंडळी सापडली, यावरून जनता सावध झाली. याचा लाभ भाजपाला होणे अपेक्षित आहे. भाजपाने महाराष्ट्राचा फार गुजरात सारखा विकास केला नाही. राज्यातील बेरोजगारी संपविली असा प्रकार नाही. जनतेला ठोस असा पर्याय नाही. पर्याय नसल्यामुळे मोठे यश मिळले व मिळत आहे. याचा अर्थ सत्ताधाऱ्यावर जनता खुश आहे असे नाही. एकतर लाडकी बहिण ही योजना सत्ता मिळविण्यासाठी यशस्वी ठरली हे चुकीचे ठरू नये, जे वास्तविकता आहे ते मान्यच केले पाहिजे. वास्तविक ठाकरे बंधुंना मुंबई महानगरपालिकेत यश मिळेल असे वाटत असेल तर चिंतन पहिल्यांदा करणे अपेक्षित आहे. त्याच प्रमाणे त्यांना मुंबई महानगरपालिकेत यश मिळेल मात्र राज्यातील इतर ठिकाणाच्या महागनरपालिकेत किती यश मिळेल याबाबत विचार केला पाहिजे. मुळात आपल्या राज्यात विरोधक आपआपली सत्ता वाढवी यासाठी प्रामाणिक प्रयत्न करीत नाहीत. सध्याला थेट बिनबुडाचे आरोप तेही अमेरिकेतील दाखला देऊन देतात. आपल्या देशात किंबहुन राज्यातील आपल्यापक्षाची ताकद कशी वाढेल यावर चिंतन करीत नाहीत. विरोधक जे स्टार प्रचारक आहेत त्यांनी नगरपालिकेच्या निवडणुकीत किती मेहनत घेतली. सत्ताधारीपक्षाने मग मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस असोत, प्रदेशाध्यक्ष किंवा बावनकुळे असोत आदिनी प्रचंड मेहनत घेतली. विरोधकांनी फारसी मेहनत घेतली नाही. मग यश कसे मितळणार? ठाकरे बंधुंनी केवळ मुंबईकडेच लक्ष दिले तर जमणार नाही. राज्यात फिरावे लागेल. जनतेत मिसळावे लागेल. सतत जनतेसोबत राहावे लागेल तरच पुर्नवैभव मिळू शकेल. एकनाथ शिंदे यांना जवेढ्या जागा मिळविता येतात तेवढया विरोधांनी जागा मिळविल्या आहेत हे मोठी विचार करायाला लावणारी बाब आहे. राज्यात सत्ताधाऱ्यावर फार मोठ्या प्रमाणात जनता खुश आहे अशातला भाग नाही. मुळात विरोधक कमकुवत असल्याचा परिणाम आहे. अशीच स्थिती राहीली तर विरोधक संपतील. लोकशाहीत विरोधकांना मोठे स्थान आहे. त्यामुळे विरोधक असले पाहिजेत, मात्र विरोधकांची सक्षम होण्याची मानसिकता नसेल तर यापुढे कोणाचे काही चालेल असे वाटत नाही. त्यामुळे विरोधकांना कमी जागा का मिळविता आल्या यावर सर्व विरोधकांनी चिंतन करणे अपेक्षित आहे.

### विमानतळ प्रकल्पबाधित गावातील प्रतिनिधींशी मुख्यमंत्र्यांनी साधला संवाद

# पुरंदर विमानतळामुळे पुणे परिसरातील औद्योगिक विकासाला प्रोत्साहन - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

- पुरंदर विमानतळाच्या भूसंपादनासाठी जास्तीत जास्त दर देण्याचा विचार
- विमानतळ परिसरात छत्रपती संभाजी महाराज यांचा भव्य पुतळा उभारणार
- प्रकल्पबाधित शेतकऱ्यांच्या मुलांसाठी कौशल्य विकास केंद्र स्थापणार, नोकरीतही प्राधान्य देणार
- प्रकल्पबाधितांना विशेष बाब म्हणून प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र देणार




**मुंबई/प्रतिनिधी :** पुण्यात अनेक उद्योग येण्यास इच्छुक असून त्यासाठी पुरंदर विमानतळ महत्त्वाचे ठरणार आहे. या विमानतळामुळे पुणे व परिसरातील औद्योगिक विकासाला प्रोत्साहन मिळेल. हे केवळ प्रवासी विमानतळ नसून कार्गो विमानतळही असल्याने नाशवंत मालाच्या व्यापारासाठी विशेष उपयुक्त ठरणार आहे. या प्रकल्पामुळे पुरंदर व परिसरातील नागरिकांना मोठा फायदा होणार असून पुण्याच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात (जीडीपी) किमान दोन टक्क्यांची वाढ होईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे केले.

पुरंदर विमानतळ प्रकल्पाच्या बाधित सात गावातील ग्रामस्थांशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज संवाद साधला. यावेळी माजी मंत्री विजय शिवतारे, अपर मुख्य सचिव (वित्त) ओ. पी गुप्ता, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी. अन्बलगन, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलरासू, पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्यासह पुरंदर विमानतळाच्या परिसरातील बाधित सात गावांचे ग्रामस्थ उपस्थित होते.

**भूसंपादनाचा जास्तीत जास्त मोबदला देणार**

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पुरंदर येथील विमानतळ हे महाराष्ट्र आणि पुण्याच्या विकासासाठी महत्त्वाचे ठरणार आहे. हा प्रकल्प व्यवहार्य होण्याच्या दृष्टीने सर्व बाबींचा सखोल विचार करून या विमानतळासाठी संपादित करण्यात येणाऱ्या जमिनीसाठी शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मोबदला देण्याबाबत निर्णय घेण्यात येणार आहे.

पुरंदर येथील एरोसिटी प्रकल्पामध्ये टीडीआर संदर्भातील सर्व लाभ दिले जातील. प्रकल्पबाधित शेतकऱ्यांच्या मुलांना शंभर टक्के नोकरीत प्राधान्य दिले जाईल. भूसंपादनाचा दर अंतिम झाल्यानंतर त्या भागातील युवकांसाठी कौशल्य विकास केंद्र सुरू करून उद्योगांना आवश्यक कौशल्य प्रशिक्षण दिले जाईल. तसेच प्रकल्पासंदर्भातील पूर्वी झालेल्या आंदोलनातील दाखल झालेले गुन्हे मागे घेण्यात येतील, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

**पुनर्वसनाला सर्वोच्च प्राधान्य**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पुरंदर प्रकल्पासाठी बाधित होणाऱ्या शेतकरी व नागरिकांच्या योग्य पुनर्वसनाला सर्वोच्च प्राधान्य आहे. शेतकऱ्यांना व त्यांच्या पुढील पिढीला संरक्षण मिळेल, याचा विचार करून मूळ जमिनीच्या दरापेक्षा जास्त दर देण्याचा विचार करण्यात येईल. त्यासाठीच रेडिरेकनर नुसार भूसंपादन न करता वाटाघाटीद्वारे भूसंपादनाचा दर ठरविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. सिडकोच्या प्रकल्पात यापूर्वी साडेबावीस टक्के लाभ देण्यात आला असून, पुरंदर विमानतळ प्रकल्पासाठी त्याहून अधिक लाभ देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

प्रकल्पबाधित घरांसाठी कुटुंबाची रचना लक्षात घेऊन पुनर्वसन करण्यात येत असून यामध्ये सज्ञान मुलांसाठी अतिरिक्त जागा देण्यात येते. कुटुंबांतील बहिणीच्या हिश्यासंदर्भातही योग्य मार्ग काढण्यात येईल. अल्पभूधारक व भूमिहीन शेतकऱ्यांसाठी काही वेगळे करता येईल का याचा विचार करण्यात येईल. पुरंदर विमानतळासाठी संपादित जमिनीचा मोबदला तसेच पर्यायी जमीन देण्याचा हा राज्यातील पहिलाच प्रकल्प ठरणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले. पुरंदर विमानतळ परिसरात छत्रपती संभाजी महाराज यांचा भव्य पुतळा उभारण्यात येणार असून, यापूर्वी संपादित केलेल्या अतिरिक्त जमिनीवरील शिक्के काढण्यात येतील. या प्रकल्पात शेतकऱ्यांना भागधारक करण्यासंदर्भातही विचार केला जाईल. गावठाण पुनर्बांधणीसंदर्भातही योग्य निर्णय घेतला जाईल. प्रकल्पबाधितांना विशेष बाब म्हणून प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र देण्यात येईल. तसेच बागायती झाडांच्या दरासंदर्भातही चर्चा करून मार्ग काढण्यात येईल. तसेच राज्यातील सर्वच प्रकल्पबाधितांसाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्याचा विचार सुरू असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

राज्य शासनाने २०१४ नंतर जे प्रकल्प राबविले ते केवळ अन् केवळ राज्याच्या विकासासाठी व नागरिकांच्या हितासाठीच राबविले गेले. या प्रकल्पामधून कोणत्याही शेतकऱ्याला भूमिहीन करण्याचा कुठलाही उद्देश नाही. आतापर्यंत राबविलेले प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर त्या भागातील शेतकरी, नागरिक समाधानी झाल्याचे दिसून आले आहे. एका विमानतळामुळे परिसरातील शेती, उद्योग, व्यापार यामध्ये मोठ्या संधी उपलब्ध होतात हे नवी मुंबई विमानतळ प्रकल्पामुळे दिसून आले आहे. त्यामुळे पुरंदर विमानतळ झाल्यानंतर नक्कीच या भागातील शेतकऱ्यांचा लाभ होईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

यावेळी जिल्हाधिकारी डुडी यांनी पुरंदर विमानतळ प्रकल्पासाठी आतापर्यंत केलेल्या कार्यवाहीची माहिती दिली. तसेच उपस्थित ग्रामस्थांमधील प्रतिनिधींनी त्यांच्या मागण्या व निवेदन यावेळी सादर केले.

# BITS पिलानी गोवा आणि फिनिक्स फाउंडेशन, लातुर यांचा बांबू मूल्यवर्धनासाठी धोरणात्मक सामंजस्य करार



**गोवा/वृत्तसंस्था :** BITS पिलानी यांच्या के.के. बिर्ला गोवा कॅम्पसने शाश्र्वत साहित्य, हरित ऊर्जा आणि ग्रामीण उपजीविकेला चालना देण्यासाठी फिनिक्स फाऊंडेशन संस्था, लातुर, कोकण बांबू आणि केन डेव्हलपमेंट सेंटर (KONBAC), आणि धनंजय बायोएनर्जी प्रायव्हेट लिमिटेड, छत्रपती संभाजी नगर याचे समवेत देशामध्ये बांबू आधारित उपक्रमांवर एकत्रित काम करण्यासाठी धोरणात्मक सामंजस्य करार केला आहे.

राष्ट्रिय बांबू मिशन च्या उद्दिष्टांशी सरेखित बांबूला या पिकाला ऊर्जा व औद्योगिक पीक म्हणून स्थान मिळावे आणि शेतकऱ्यांना अतिरिक्त लाभ मिळवून देताना शाश्वत औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी शेतकरी, शैक्षणिक संस्था, उद्योग आणि सरकारी संस्थांना एकत्रित करणाऱ्या व्यापक परिसंस्थेची गरज या उपक्रमातून अधोरेखित होते.

या कराराअंतर्गत बांबू-आधारित कार्बन उत्पादने, विशेष रसायने, संमिश्र व इंजिनिअर्ड साहित्य यावर संशोधन व नवोपक्रमाला चालना दिली जाईल, तसेच प्रक्रिया तंत्रज्ञान, मानके, SOPs, प्रोटोटाइप आणि पायलट-स्केल उपाययोजना विकसित केल्या जातील.

कौशल्य विकास, प्रशिक्षण, इंटर्नशिप आणि शैक्षणिक-उद्योग संबंध मजबूत करण्यावर भर दिला जाईल, तर ग्रामीण उद्योजकता, हरित उपजीविका आणि शाश्वत औद्योगिक परिसंस्थेला प्रोत्साहन दिले जाईल. बांबू-आधारित नवोपक्रमांचे तंत्रज्ञान हस्तांतरण आणि व्यावसायिकीकरण सुलभ करण्यासाठीही प्रयत्न केले जातील.

या सामंजस्य करारावर राज्य कृषी मुल्य आयोगाचे अध्यक्ष तथा मुख्यमंत्री पर्यावरण व शाश्र्वत विकास टास्क फोर्स चे कार्यकारी अध्यक्ष आणि फिनिक्स फाउंडेशन चे अध्यक्ष. पाशा पटेल, BITS पिलानी गोवा कॅम्पसचे संचालक प्रा. सुमन कुंडू , KONBAC चे संचालक संजीव कर्पे, आणि धनंजय बायोएनर्जी प्रायव्हेट लिमिटेडचे मुख्य तंत्रज्ञान अधिकारी धनंजय कंदाकुरे यांनी स्वाक्षरी केली.

या करारावेळी BITS पिलानी यांच्या के.के. बिर्ला गोवा कॅम्पसचे प्रो. शिबू क्लेमेंट (आर अँड आय सहयोगी डीन) आणि प्रो. एस. डी. मांजरे (केमिकल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख) उपस्थित होते. या मिशन-मोड कार्यक्रमाची संकल्पना प्रो. अभिषेक शर्मा यांनी मांडली असून, प्रो. शरद आणि प्रो. मृणालिनी गायधने यांनी अंमलबजावणीत महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. या भागीदारीमुळे भारतातील बांबू-आधारित नाविन्यपूर्ण परिसंस्थेला बळकटी मिळेल, ज्यामुळे शाश्र्वत तंत्रज्ञानाचा विकास, ग्रामीण आर्थिक वाढ आणि हवामान-सकारात्मक औद्योगिक प्रगती साध्य होण्यास मदत मिळणार आहे.

**लोदगा येथे नापिक जमीनीवर बांबु पासुन निर्मित बायोचार चा वापर करुन जमीन सुपीक करण्याचा महत्वाकांक्षी प्रयोग राबविणार**

स्वातंत्र्यापुर्वी देशातील जमीनी मध्ये कर्बाचे प्रमाण ३ टक्के होते ज्यामुळे जमीनीची सुपीकता कायम होती परंतु नंतरच्या काळात जमीनीच्या कर्बामध्ये प्रचंड प्रमाणात घट होऊन हे प्रमाण ०.२ टक्के ते ०.३ इतके कमी झालेले असल्याने परिणामी शेतीमालाच्या उत्पनावर कमालीची घट होत आहे. या वर उपाय करणे अती आवश्यक आहे.

बांबु पासुन तयार होणारे बायोचार हे जमीनी मध्ये कर्बाचे प्रमाण वाढविण्यास मोठ्या प्रमाणात मदत करते, म्हणुन BITS पिलानी यांच्या के.के. बिर्ला गोवा कॅम्पसच्या माध्यमातुन बांबु पासुन तयार होणारे बायोचार लोदगा जि. लातुर येथे नापिक जमीनीवर बांबु पासुन निर्मित बायोचार चा वापर करुन जमीन सुपीक करण्याचा महत्वाकांक्षी प्रयोग सुरु होणार आहे.

# प्रत्येकाला सुंदर दिसायची इच्छा असतेच.....

सौंदर्याचे अप्रूप कोणाला नसते हो! प्रत्येक जण सुंदर दिसण्यासाठी धडपडत असतो. खरे सौंदर्य म्हणजे मनाचे सौंदर्य ही बाब खरी असली, तरी प्रत्येकाला सुंदर दिसायची इच्छा असतेच. काही जणांना निसर्गतःच उत्तम रूप लाभते; मात्र अनेक जण आपल्याला मिळालेले रूप तसेच चांगले राखू शकत नाहीत. अर्थातच त्यासाठी वाईट सवयी कारणीभूत असतात. सौंदर्यात चेहऱ्याचे स्थान महत्त्वाचे असते. जॉ लाइन परफेक्ट असली, तर सौंदर्य किती तरी पट वाढते; मात्र हनुवटीच्या खाली चरबी जमा झाली, तर ते सौंदर्याला बाधा आणते. त्याला डबल चिन लूक असे म्हणतात. त्यामुळे चेहऱ्याचा आकार तर बिघडतोच; पण चेहरा असंतुलित दिसू लागतो. त्याची कारणे जाणून घेऊ या आणि त्या समस्येवरचा उपाय जाणून घेऊ या.

सर्वसाधारणपणे ही समस्या पंचविशीनंतरच्या वयात उद्भवते. कारण त्यानंतर त्वचेचा ताण कमी होऊ शकतो आणि ती सैल पडू शकते. त्यामुळे हनुवटीच्या खाली चरबी जमा होऊ शकते. काही व्यायामांच्या मदतीने ही चरबी कमी करता येऊ शकते.

लठ्ठपणा हे डबल चिनचं एक महत्त्वाचं कारण आहे. काही जणांमध्ये आनुवंशिकतेमुळे ही समस्या उद्भवते. कुटुंबात आधीच्या पिढीतल्या कोणाला ही समस्या असेल, तर पुढच्या पिढीतल्या व्यक्तींनाही ती उद्भवू शकते.

वाढत्या वयाबरोबर त्वचा सैल पडू लागते आणि काही जणांमध्ये तर ती लटकूही शकते. त्यामुळे डबल चिनसारखी दिसू लागते. विचित्र खाद्यपदार्थ खाणं, गोड पदार्थ अधिक खाणं, विचित्र जीवनशैली यांमुळे शरीरात फॅट्स वाढतात. तसंच, त्वचा ढिली पडण्याचंही ते एक कारण असू शकतं.

डबल चिन परिस्थिती कमी करण्यासाठी काही व्यायाम प्रकार पाहू या.

**१ –** तोंडाचा आकार 'ओ'च्या मुद्रेप्रमाणे करावा. त्यानंतर वरचा ओठ आपल्या दातांवर आणावा. त्यानंतर खालचा ओठ बाहेरच्या बाजूला आणावा. या स्थितीत १०-१५ सेकंद राहावे आणि मग रिलॅक्स व्हावे. ही क्रिया १० वेळा करावी.

२ – आपले तोंड जितके उघडता येईल, तितके उघडावे आणि खालच्या जबड्याला खालच्या बाजूला ताणल्यासारखे करावे. १०-१५ सेकंदांपर्यंत तसेच राहावे आणि रिलॅक्स व्हावे. ही क्रिया १० वेळा करावी.

३ – सरळ उभे राहावे आणि डोके हळूहळू उजव्या बाजूला वळवावे. जितके शक्य असेल तितके वळवण्याचा प्रयत्न करावा. १०-१५ सेकंदे त्याच स्थितीत राहावे आणि हीच क्रिया डाव्या बाजूलाही करावी. १० वेळा ही क्रिया दोन्ही बाजूंना करावी.

४ – तोंड शक्य असेल तितकं उघडावं आणि जीभ बाहेर काढावी. जीभ वरच्या बाजूला शक्य असेल तेवढी बाहेर नेण्याचा प्रयत्न करावा. १०-१५ सेकंदं त्याच स्थितीत राहून मग रिलॅक्स व्हावं. ही क्रिया १० वेळा करावी.

५ – हलक्या हातांनी आपल्या चेहऱ्यावर खालच्या बाजूच्या दिशेने मालिश करावं. खासकरून हनुवटीपासून गळ्यापर्यंत मालिश करावं. त्यामुळे ब्लड प्रेशर वाढतं आणि डबल चिन समस्या कमी होते.

हे व्यायाम रोज केल्यास फरक दिसू लागेल. संतुलित आहार, चांगली झोप आणि चांगली जीवनशैली यांचाही ही समस्या कमी होण्यासाठी हातभार लागतो. ही समस्या खूपच जास्त प्रमाणात असेल, तर डॉक्टरांचा सल्ला घ्यायलाच हवा.

# संध्याकाळी ४ ते ६ हीच वेळ वजन वाढीला कारणीभूत, 'या' वेळेत काय खाता हे महत्त्वाचे

हल्ली प्रत्येकजणच अनेक शारीरिक समस्यांमधून जात असते. अशावेळी डाएटची काळजी घेणे हा त्यांच्या एक दिनक्रमाचा भाग होत आहे. असं असताना दिवसभरात आपण काय खातो. यासोबतच आपण सायंकाळी ४ ते ६ यावेळेत काय खातो हे देखील तितकेच महत्त्वाचं आहे. कारण आपल्या शरीरातील कोर्टिसोल पातळी योग्य प्रमणात राखण्यासाठी ही वेळ महत्त्वाची असते.

कोर्टिसोल हा एक हार्मोन आहे जो तुमच्या शरीराला तणावाला प्रतिसाद देण्यास मदत करतो, रक्तातील साखरेचे नियमन करतो आणि रक्तदाब राखतो. पोषणतज्ज्ञ ऋजुता दिवेकर यांच्या म्हणण्यानुसार, दुपारी ४ ते ६ वाजेपर्यंतचा काळ हा आपल्या सर्वांगीण आरोग्यासाठी महत्त्वाचा काळ असतो. इंस्टाग्रामवर पोस्ट केलेल्या व्हिडिओमध्ये ऋजुताने शेअर केले की ''कोर्टिसॉल नैसर्गिकरित्या कमी होण्याची वेळ आली आहे परंतु जर तुम्ही हुशार असाल तरच. जर तुम्ही हायपोग्लाइसेमिक असाल तर कोर्टिसोल चुकीचे वागते, ज्यामुळे तुम्हाला भूक लागते, अस्वस्थ, निद्रानाश होतो.

जास्त कोर्टिसोलमुळे वजन वाढणे, निद्रानाश आणि मूड बदलणे यासारख्या समस्या उद्भवू शकतात, असे ऋजुता सांगते. संतुलित जीवनशैली कोर्टिसोलची पातळी कंट्रोलमध्ये ठेवण्यास मदत करू शकते.

ऋजुता दिवेकर यांनी कोर्टिसोलची पातळी संतुलित करण्यासाठी संध्याकाळी ४ ते ६ या वेळेत हलके, गरम जेवण घेण्याचा सल्ला दिला. अशावेळी ऋजुताने आपलं काम आणखी सोपं केलं आहे. यामध्ये तिने काय खावे आणि काय टाळावे हे सांगितलं आहे.

४ ते ६ या वेळेत काय खावं

१. **सोमवार:** साबुदाणा खिचडी
२. **मंगळवार:** मसाला डोसा
३. **बुधवार:** थालीपीठ
४. **गुरुवार:** नाचणी डोसा आणि पनीर
५. **शुक्रवार:** सेवई उपमा किंवा भजिया यापैकी एक निवडा
६. **शनिवार:** थेपला किंवा थिखट शेरा

व्हिडिओमध्ये, पोषणतज्ञ ऋजुता दिवेकर यांनी देखील संध्याकाळी ४ ते ६ दरम्यान जेवण करण्याचे फायदे सांगितले:

**१. आराम मिळतो.**

दिवसभर काम केल्यानंतर, संध्याकाळचे पौष्टिक जेवण तुम्हाला आराम आणि अस्वस्थता दूर करण्यास मदत करते. हे तुम्हाला उत्साही वाटू शकते, म्हणून जेव्हा तुम्ही घरी पोहोचता तेव्हा तुम्हाला फ्रेश वाटते.

**२. क्रेविंग कमी होते**


संध्याकाळचे पौष्टिक जेवण घेतल्याने तुमची फास्ट फूड स्नॅक्सची लालसा कमी होऊ शकते. बऱ्याचदा, आपण संध्याकाळी जंक फूड खातो, परंतु पौष्टिक जेवण आपल्याला पोटभर ठेवते आणि अनावश्यक स्नॅकिंग टाळते.

**३. चांगली झोप**

हलके आणि संतुलित संध्याकाळचे जेवण तुम्हाला रात्रीचे जेवण करण्यास मदत करू शकते. हे चांगल्या झोपेच्या गुणवत्तेत योगदान देते, ज्यामुळे तुम्ही सकाळी ताजेतवाने जागे होऊ शकता. त्यामुळे दुसऱ्या दिवशी सकाळी व्यायाम करणेही सोपे होते.

# ज्ञानदेवे रचिला पाया...

मायभाषा : डॉ. वीणा सानेकर



ऋद्धिपूर या स्थळाचे मराठीच्या दृष्टीने ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने मराठी विद्यापीठाची स्थापना या ठिकाणी केली आहे. मराठीच्या विकासासाठी नवे विद्यापीठ उभे राहणे ही चांगली गोष्ट आहे. मात्र या पार्श्वभूमीवर 'शिक्षणातील मराठी' या विषयाचा अंतर्मुख होऊन विचार करणे गरजेचे आहे. मी यापूर्वी या सदरातून आणि अन्यत्र देखील शिक्षणातील मराठीचे जतन संवर्धन या विषयाला वारंवार स्पर्श केलेला आहे . याबाबत काही मुद्यांचा पुनरुच्चार पुन्हा पुन्हा होणे गरजेचे आहे. शिक्षणातील मराठी माध्यम या विषयाला विविध राजकीय कंगोरे प्राप्त झाले आहेत. शालेय स्तरावर एकीकडे एका भाषेसमोर दुसरी भाषा उभी करणे, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शाळांचे स्तोम माजवणे, मराठी शाळांसाठी राखीव असलेले भूखंड लाटण्याची कारस्थाने करणे हे प्रकार सुरू आहेत. कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये २००२ सालापासून मराठीसमोर उभ्या ठाकलेल्या बागुलबुवाचे भय अजूनही संपलेले नाही.

पदवी पातळीवर मराठी भाषा व साहित्याचा अभ्यास जिथे वर्षानुवर्ष सुरू होता तिथे आज विभाग ओस पडतील की काय अशी असुरक्षितता निर्माण झाली आहे. पदव्युत्तर स्तरावर मोजकी विद्यापीठे सोडली तर मराठीची स्थिती काय आहे, याचा लेखाजोखा घेण्याची वेळ येऊन ठेपली आहे. कोणतीही भाषा जगवण्यासाठी ती उच्च शिक्षणात जगली पाहिजे आणि त्यासाठी अस्तित्वात असलेल्या विद्यापीठांनी कृतिशील पावले उचलली पाहिजेत. त्यासाठी वेगवेगळ्या विद्यापीठांनी मराठी भाषेसंबंधातील नवनवीन अभ्यासक्रम सुरू करणे गरजेचे आहे. वेगवेगळ्या विद्याशाखांमधील मुलांनी भारतीय भाषांचा अभ्यास करण्याचा मार्ग नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने आज खुला केला आहे. विद्यापीठांनी यासाठी भाषांच्या अभ्यास व संशोधनाला चालना आणि प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. मला अभिमानाने हे नमूद करावेसे वाटते की आमच्या सोमैया विद्याविहार विद्यापीठाने पदव्युत्तर तसेच पीएचडी पदवीसाठी मराठीचे अभ्यासक्रम तर सुरू केले आहेतच; परंतु तसेच भाषा आणि साहित्याच्या अंगानेही नावीन्यपूर्ण अशा विविध अभ्यासक्रमांचीही रचना केली आहे . महाराष्ट्रात मराठीच्या जतन संवर्धनासाठी शासनाने मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून देण्याची गरज आहे. शासनाचे भाषा विभाग, सांस्कृतिक विभाग यांनी याकरता उचित पावले उचलणे ही त्यांची जबाबदारी आहे .

केवळ उत्सवी कार्यक्रमांमध्ये न रमता एकीकडे मराठीचे संचित जपून ठेवण्यासाठी आणि दुसरीकडे ज्ञानभाषा म्हणून मराठीचा विकास करण्यासाठी तत्पर राहण्यासाठी शासनाने आणि कंबर कसली तरच अभिजात मराठी कळसाला पोहोचलेली दिसेल. अन्यथा 'ज्ञानदेवे रचिला पाया, उभारिले देवालया 'हे म्हणण्याचा आम्हाला काय अधिकार ?

# रिकाम्या पोटी पपई खाल्ल्याने हे आरोग्यदायी फायदे मिळतात



निरोगी राहण्यासाठी योग्य आहार घेणे आवश्यक आहे. कारण योग्य आहार आणि जीवनशैली आपल्याला निरोगी आणि रोगमुक्त ठेवते. निरोगी राहण्यासाठी, तुम्हाला निरोगी खाण्याच्या सवयी देखील अंगीकारल्या पाहिजेत. दररोज रिकाम्या पोटी पपई खाल्ल्याने तुमचे आरोग्य सुधारेलच पण अनेक आजारांपासूनही आराम मिळेल.

पपईला आवश्यक पोषक तत्वांचे पॉवरहाऊस म्हणून ओळखले जाते, म्हणून ते तुमच्या आहारात समाविष्ट करणे खूप फायदेशीर आहे. सकाळी नाश्त्यापूर्वी पपई खाण्यास सुरुवात केली तर तुमच्या आरोग्यात बदल दिसून येईल. चला जाणून घ्या फायदे.

चरीरींहळ

पपई पचनसंस्थेसाठी वरदान

पपई खाणे हे पचनसंस्थेसाठी वरदान मानले जाते. त्यात पपेन नावाचे एंजाइम असते, जे प्रथिने पचवण्यास मदत करते. शिवाय, पपईतील फायबर बद्धकोष्ठतेपासून मुक्त होण्यास मदत करते. दररोज पपई खाल्ल्याने अपचन, गॅस आणि आम्लता यासारख्या पोटाच्या समस्या दूर होतात.

-ङडज ठए-ऊ कोणी चिया सीड्स खाणे टाळावे ?

पपई रोगप्रतिकारक शक्ती वाढवते

आरोग्य तज्ज्ञांच्या मते, दररोज पपई खाल्ल्याने रोगप्रतिकारक शक्ती वाढते. पपई हे व्हिटॅमिन सीचा एक उत्तम स्रोत आहे. मध्यम आकाराच्या पपईमध्ये संत्र्यापेक्षा तीन पट जास्त व्हिटॅमिन सी असते. व्हिटॅमिन सी शरीराची रोगांशी लढण्याची क्षमता मजबूत करते, ज्यामुळे सर्दी आणि संसर्गाशी लढण्यास मदत होते.

डोळ्यांसाठी फायदेशीर

तज्ज्ञांचे म्हणणे आहे की पपईमध्ये व्हिटॅमिन ए आणि बीटा-कॅरोटीन भरपूर प्रमाणात असते, जे डोळ्यांच्या आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर असतात. ते वृद्धत्वाशी संबंधित मोतीबिंदू आणि दृष्टी कमी होण्याचा धोका कमी करण्यास मदत करू शकते. कमकुवत डोळ्यांसाठी पपई खूप फायदेशीर आहे कारण त्यात जीवनसत्त्वे अ, क आणि ई असतात, तसेच लायकोपीन, झेक्सॅन्थिन आणि बीटा-कॅरोटीन सारखे पोषक घटक असतात, जे दृष्टी सुधारतात, तीव्र सूर्यप्रकाशापासून रेटिनाचे संरक्षण करतात आणि मोतीबिंदू आणि इतर आजारांपासून संरक्षण देतात .

-ङडज ठए-ऊ पोटातील गॅसची समस्या काही मिनिटांत दूर होईल, हे घरगुती उपाय करा

पपई वजन कमी करते

पपई खाल्ल्याने वजन कमी होण्यासही मदत होते. कमी कॅलरीज आणि उच्च फायबर सामग्रीमुळे, पपई वजन कमी करण्यास खूप उपयुक्त ठरू शकते. ते तुम्हाला जास्त काळ पोट भरलेले ठेवते

पपई त्वचेसाठी फायदेशीर

वजन कमी करण्यासोबतच, पपई खाणे त्वचेसाठी देखील अत्यंत फायदेशीर आहे. पपईमध्ये असलेले अँटीऑक्सिडंट्स आणि व्हिटॅमिन सी त्वचेसाठी अत्यंत फायदेशीर आहेत. ते सुरकुत्या कमी करण्यास, त्वचा घट्ट करण्यास आणि रंग सुधारण्यास मदत करते. पपईचा फेस पॅक लावल्याने त्वचा उजळते.

# घेतला वसा टाकू नये




असामी-काळजीवाहक सरकार, मत पूछो मेरा कारोबार क्या है, मोहब्बत की छोटी सी दुकान है इस बाजार में... अंगातलं सारं बळ एकवटून मदत करण्याची ताकद असलेला तो किंवा ती म्हणजे, सामान्यातली असामान्य माणसं होत. सर्वसामान्यांच्या डोक्यावर भक्कम आधाराचा हात असणं ही त्यांची खूण, जी जगायला उद्युक्त करते. आपला हात जगन्नाथ असणारी मोजकीचं माणसं वेळेवर मदतीला येतात. वाईट घटनेत, दुःखद प्रसंगी तुमच्याबरोबर खंबीर उभ्या असलेल्या माणसांना विसरायचं नसतं, हा नियम मागील पिढी पाळत आलीय; आपणही त्यांचं अनुकरण करून सदैव साथ देणाऱ्या खंबीर मनाच्या माणसांचा आदर्श धरायला हवा. मन, हृदय हे प्रत्येकात असलं तरी त्यात वसलेला चांगुलपणा हा फक्त आणि फक्त मोठ्या मनाच्या लोकांकडे पाहायला मिळतो. अंतकरणात सामावलेला ईश्वर आपल्या जवळ येतो, तो केवळ इच्छापूर्तीने आणि योगायोगाने. चांगुलपणाची किर्ती पसरायला वेळ लागत नाही. चांगल्या गोष्टीचं गुणगान करताना दाद देणं, वाईट गोष्टीकडे दुर्लक्ष करणं आणि अधिक चांगला मार्ग शोधून उत्कृष्ट कार्यक्षमता निर्माण करणं हे या प्रकारातल्या निस्वार्थी लोकांना जमतं. आणीबाणी प्रसंग, अटीतटीची वेळ, अतिव दुःखाचे डोंगर पार करण्यासाठी तत्पर असणाऱ्या व्यक्ती आपल्यासाठी उत्तुंग आणि प्रतिभावान ठरतात ते या साठीचं. देणाऱ्याने देत जावे घेणाऱ्याने घेत जावे, या म्हणीचा मूळ उद्देश लक्षात घेता, एखाद्याकडून कोणत्याही प्रकारची मदत घेताना त्याची त्या मागची किमान भावना लक्षात घेणं गरजेचं ठरतं; नाही तर नुसतचं घेत रहाणाऱ्यांची संख्या इथं कमी नाही. बोट पकडताना हात ओढून घेण्याची मानवाची कूपमंडूक वृत्ती मदत करणाऱ्याला, त्याच्या मदतीला अडथळा आणू शकते. मदत याचा अर्थ वेळेनुरूप करण्यात आलेली ऐच्छिक कृती. सत्याची वस्तुस्थिती जाणून, इच्छेने समस्येचे निराकरण करणं, त्यातून उत्कृष्ट कार्यक्षमता साधणं, या हाताने केलेलं कार्य त्या हाताला न कळणं, भावना आणि कल्पनांच्या आहारी न जाता कृतीशीलतेने वस्तुस्थितीला आकार देण्याच्या प्रयत्नात स्वतःकडून सर्वस्वी सहकार्य देऊन वास्तवाशी एकरूप होणं या कामाला मदत ही उपाधी देता येईल. अशी माणसं कर्तव्यासाठी मागेपुढे पाहत नाहीत. माझ्याकडून जेवढं होईल तेवढं सहकार्य आणि कर्मफळाची अपेक्षा न बाळगण्याची इच्छा त्यांच्याजवळ असते. आपल्या असण्याने समोरच्या दुःखी, कष्टीताला येणारं लाखोंच बळ कर्तव्यपूर्तीचे समाधान घेऊन ही कर्तव्यदक्ष माणसं वावरत असतात. ही माणसं आपल्या अवतीभवती असतात म्हणून आपण मोकळा श्वास घेऊ शकतो. आपली सगळी मदार यांच्या खांद्यावर पेललेली असते. तेव्हा त्यांना विसरणं अशक्यप्राय होय. ज्यांची आयुष्यात कसुभर का होईना मदत झाली असेल त्याची जाणिव मनात जपायला हवी. आई, वडील, बहीण, भाऊ, मित्र, मैत्रिणी, ओळखीचे कोणीही असो त्याच्या प्रति जाणीव असायला हवी.

अशी माणसं देव माणसासारखी असतात; नव्हे ती आपल्यासाठी देव माणसचं असतात. जिथं नाही कुणी तिथं देव उभा मनी. देव पांडुरंग माणसाच्या रूपाने भक्ताच्या हाकेला धावतो. गोऱ्या कुंभाराच्या मातीत सत्व ओतणारा, सावत्या माळ्याच्या उभ्या शेतात मळा फुलवणारा सखा पांडुरंग तन-मन-धनाने भक्ताला पावतो. तसाचं शंभरातला एखादा माणूस, त्या माणसातला देव संकटात मदतीला उभा ठाकतो. परिस्थितीतीला तारण्याचं बळ देतो. हाताच्या दोन्ही बाहूंची ताकद, सर्वस्व पणाला लावत, उभं करतो आपणास. परिस्थिती मानवाला शिकवते पण परिस्थितीचा फायदा घेऊ नये असे म्हणताना मदतीच्या वेळी धावणाऱ्या लोकांप्रति आदर सद्भावना ठेवणं, त्यांच्या अमूल्य वेळेचा, सामाजिक जाणीवेचा कृतकृत्य भाव आपल्यात जागृत ठेवणं या प्राथमिक तत्त्वांच मूल्य जाणणं, त्यांच्यातल्या समर्पणाचं भान राखणं, एवढं जरी आपण केलं तरी, त्यांच्या चिन्मय सद्भावना सदैव आपल्या पाठीशी राहतील. श्रम आणि मदतीचा आनंद देणारी अशी माणसं आपल्या आसपास असताना त्यांच्याप्रति निष्ठा बाणायला हवी. सत्कारणी लागणारी मदत एखाद्यास करावी, पण मदत करणाऱ्या दानशूरांना मात्र विसरू नये. या परंपरेत ऊतू नये, मातू नये, घेतला वसा टाकू नये ची शिकवण सार्थ ठरेल. आपलं मनोधैर्य खचू न देणाऱ्या, आपल्यावर प्रेम करणाऱ्या आणि आपणास शिडीसारख्या उपयोगी ठरणाऱ्या माणसांच्या चांगुलपणाचा विजय असो. तो आपल्या अंतःकरणात साजरा होओ. परतीच्या अपेक्षेने न केलेले, जीवनअंशाचे खरे कर्म तसचं दानधर्माच्या सत्कृत्याने संचयातील धन कधीचं आटत नाही. मान, दान आणि ज्ञान या गोष्टीसह कृपावंत मदत ओंजळीत भरून घेताना, भरून सांडलेले मातीत मिसळण्यापूर्वीचं हे दानकरी हात सांभाळायला हवेत. दान देण्यासाठी पसरलेले कृपावंत हात या जगाची नाव हाकतात हे तंतोतंत खरयं, तेव्हा आपल्यासारख्या तमाम गरजूंना उपयोगी ठरणाऱ्या महान व्यक्तिविषयी आदर बाळगणं आणि तो व्यक्त करणं नेहमीच उचित आहे.

**-पूजा काळे, मोरपीस**

## पौष्टिक खा, फिट राहा!

### डॉक्टर टीप्स



नव्या वर्षात तुम्ही फिटनेसच्या दृष्टीनं काही संकल्प करत असाल तर त्याची सुरुवात आतापासून करणं गरजेचं आहे. सध्याचा काळात अत्याधुनिक जिम आणि उत्तम व अनुभवी व्यायाम प्रशिक्षक या सर्वांमुळे कठीण वाटणारा व्यायाम आता सोपा वाटू लागला आहे. तसंच काळाची गरज जाणून अनेकांती पावलं जिमच्या दिशेनं वळू लागली आहेत. तुमच्या संकल्पाच्या दृष्टीनं फायदेशीर ठरतील अशा व्यायामाच्या प्रकारांविषयी आजच्या लेखातून जाणून घेऊ या...

स्पिनिंग

या व्यायाम प्रकारात सायकल चालवण्यास प्राधान्य दिलं जातं. हे हृदय आणि फुफ्फुसासाठी फायदेशीर असतं. तुमच्या पायांच्या स्नायूंना देखील बळकटी मिळते. सायकलींमध्ये येणाऱ्या नवनव्या तंत्रज्ञानामुळे लोकांची सायकल चालवण्यात रुची वाढली आहे. सोबतच व्यायाम करण्यासाठी इतर पर्यायांसोबतच सायकलचा वापर देखील वाढत चालला आहे. तुम्हीही सायकल वापरा आणि आरोग्य सांभाळा.




## विनोद

राधा : काय गं राणी, तुझ्या नवऱ्याला तुरुंगात का जावे लागले?

राणी : काय नाही गं, यांनी नोटा छापायची सरकारशी स्पर्धा केली म्हणून.

## संदेश

Tourist = Ye kiska kankaal hai..?

Santa = Ye tipu-sultaan ka kankaal hai..

Tourist = Or ye bagal wala chhota sa kankaal kiska hai..?

Santa = Ye bhi tipu-sultaan ka kankaal hai.. jab wo chhota bachcha tha….

## सुविचार




शब्दांपेक्षा मौनच जास्त बोलके असते.
- कार्लाइल

**संस्कृत सुभाषित**

आयु: सत्त्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धना:।
रस्या: ास्निग्धा: ास्थिरा हृद्या आहारा:
सात्त्विकप्रिया : ।।

अर्थ - जो आहार आयुष्य, मनोबल, शक्ती, प्रेम, सुख यांचे संवर्धन करतो, तोच आहार सात्त्विक लोकांना प्रिय असतो.(हा स्निग्ध आणि रसमय आहार असतो.)

# मनोरंजक महाशब्दकोडे



## आडवे शब्द

१. खर्चात कपात
६. पुष्कट
९. पोटापुरता शिधा
११. प्रमाणपत्र
१२. विश्रांती
१४. गणगोत
१६. तात्काळ
१८. आपला देश
१९. मोठी चूल
२०. चोरी करणारा
२२. झाडलोट
२४. वाढलेला व्याप
२५. जरतारीचा मोर यावर नाचतो
२७. प्रयत्न
२८. घाव, प्रहार
२९. रोखलेली नजर
३१. संतोष, आनंद
३४. समुद्रकिनारा
३८. पुरुष
३९. शिव! शिव!
४०. नुसतीच भटकंती
४१. विशेष
४२. अत्यंत यातनामय अवस्था
४५. माळ, सर
४६. हात
४८. पर्जन्य
४९. फोडातील द्रव
५०. गप्पांची जागा
५२. वक्र
५३. पूर्ण भेदून जाणारे
५४. शरीर
५५. अरण्य, जंगल
५६. तीव्र, अत्यंत टोकदार
५७. दिवस
५९. अर्धांगवायू
६१. चर्चा
६३. कावळा
६४. थोडेसुद्धा, अल्पप्रमाण
६५. टोळीचा प्रमुख
६७. खिडकी
६९. मच्छर
७१. तातडीचे संदेशवहन करण्याचा नामशेष झालेला प्रकार
७३. हनुमान (ग्रा.)
७५. प्रेम, ममता
७७. हमाल
८१. सूर्याचे एक नाव
८२. ठोक, हाण!
८३. युक्ती
८४. नेता, पुढारी

## उभे शब्द

१. कपडालत्ता
२. टिंगल, टवाळी
३. केव्हा (ग्रा.)
४. शाश्वत, चिरंतन
५. सोन्या-चांदीचा व्यापारी
७. महाशिवरात्रीचा मराठी महिना
८. परस्पर
९. पुन्हा पुन्हा
१०. प्रगती, उन्नत
१२. विमान
१३. कच्चे राहिल्यास निरूपयोगी मृत्तिकापात्र
१५. निवासस्थान
१७. आत-बाहेर करण्याची चौकट
२१. दात
२३. वंशपरंपरागत अधिकार
२६. फळातील द्रव
२७. सामान्य
३०. तापापूर्वीचे शहारे
३२. माणूसकी
३३. धैर्य, हिंमतीचे काम
३५. मगज
३६. कडक, न दबणारे
३७. साहित्यातील नऊ भावना
४१. मीठाची चव
४२. नाकी दम आणणारा आकडा
४३. भरपूर रस असलेला
४४. वेडावाकडा
४५. परिस्थिती
४६. पळसाचा डिंक
४७. जन्म-मृत्यू
४८. मोदकाचे आच्छादान
५०. पत्र
५१. अभिप्राय
५३. नाविकदल
५५. मध्यरात्रीचा पाऊस
५८. विरोध, द्वेष
६०. आठवड्याचा दिवस
६२. चिकटून, जवळ
६६. अति तीव्र, जाळणारे
६८. माफी, दया
७०. दाताखालचा, मदतनीस
७२. महान
७४. कैकयीची दासी
७६. वेदना
७७. वजन
७८. सुंदर तरुणी, पत्नी
७९. शंकर
८०. शेवट

## आडवे उत्तरे

१.काटकसर ६.अमाप ९.पसाभार ११.परवाना १२.आराम १४.घरदार १६.तडकाफडकी १८.भारत १९.भट्टी २०.चोर २२.कोवारे २४.पसारा २५.पदर २७.सायास २८.वार २९.टक ३१.समाधान ३४.सागरतट ३८.नर ३९.हरहर ४०.वणवण ४१.खास ४२.नरकवास ४५.हार ४६.कर ४८.पाऊस ४९.लस ५०.टमटमनगरी ५२.वाकडा ५३.आरपार ५४.तन ५५.रान ५६.तीक्ष्ण ५७.वासर ५९.लकवा ६१.मसलत ६३.काक ६४.लवमात्र ६५.सरदार ६७.गवाक्ष ६९.डास ७१.तार ७३.हणमंत ७५.माया ७७.भारवाहक ८१.प्रभाकर ८२.मार ८३.करामत ८४.नायक

## उभे उत्तरे

१.कापडचोपड २.टर ३.कवा ४.सनातन ५.सराफ ७.माघ ८.परभारे ९.परतपरत १०.भरभराट १२.आकाशयान १३.मडके १५.दार १७.कीरवा २१.रद २३.वारसाहक्क २६.रस २७.साधारण ३०.कसकस ३२.मानवता ३३.साहस ३५.गर ३६.टणक ३७.नवरस ४१.खारट ४२.नऊ ४३.रसवान ४४.वाकडातिकडा ४५.हालहवाल ४६.कमरकस ४७.जननमरण ४८.पारी ५०.टपाल ५१.मत ५३.आरमार ५५.रातवा ५८.सवतासुभा ६०.वार ६२.लगत ६६.दाहक ६८.क्षमा ७०.सहाय्यक ७२.थोर ७४.मंथरा ७६.यातना ७७.भार ७८.वामा ७९.हर ८०.अंत



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### भारतीय महिला क्रिकेटर्सची अचानक पगारवाढ; बीसीसीआय कडून नवीन वर्षाच्या निमित्ताने....

मुंबई -भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसी-सीआय) कार्यकारी परिषदेने देशांतर्गत क्रिकेट स्पर्धेत समान मानधनाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकत, महिला क्रिकेटपटू आणि प्रशिक्षकांच्या मानधनात दुप्पट वाढ करण्याचा निर्णय सोमवारी झालेल्या बैठकीत घेतला. अचानकच झालेल्या या पगार वाढीमुळे देशांतर्गत क्रिकेटवर आणि त्याच्या व्यावसायिकतेमध्ये मोठे बदल होऊ शकतात.या निर्णयामुळे देशांतर्गत क्रिकेट खेळणाऱ्या वरिष्ठ महिला खेळाडूंना सध्याच्या २० हजार रुपयांच्या दैनंदिन सामन्याच्या मानधनाऐवजी आता ५० हजार रुपये इतके मानधन मिळणार आहे. हे मानधन अंतिम ११ जणींत निवड होणाऱ्या खेळाडूंसाठी असेल. सामन्यांमध्ये राखीव खेळाडूंना १० हजार रुपयांऐवजी आता २५ हजार रुपये मानधन मिळणार आहे.सर्व प्रकारच्या सामना खेळाडूंच्या मानधनात वाढ-मानधनवाढीचा निर्णय सर्व प्रकारच्या क्रिकेट पद्धतीत घेण्यात आला आहे. आता राष्ट्रीय ट्वेन्टी-२० स्पर्धेतील सामन्यात अंतिम ११ प्लेयर्समध्ये निवडलेल्या खेळाडूंना २५ हजार रुपये, तर राखीव खेळाडूंना १२ हजार ५०० रुपये इतके मानधन मिळणार आहे. महिलांच्या मानधन वाढीच्या निर्णयामुळे आता एखादी महिला खेळाडू सर्व क्रिकेट प्रकारात पूर्ण हंगाम खेळली असेल तर तिला किमान १२ ते १४ लाख रुपये कमवता येतील.

### मशुभमनसाठी वाईट वाटले, अजून किती सरप्राईज... टी-ट्वेंटी वर्ल्ड कप स्कॉडवर भडकला म्हणाला...

मुंबई-भारतीय क्रिकेट सध्या एका अनोख्या स्थितीत असून भविष्यात काय होईल याचा अंदाज बांधणे कठीण झालं आहे, असं मत माजी क्रिकेटपटू रॉबिन उथप्पाने व्यक्त केलं आहे. शुभमन गिल आणि जितेश शर्मा यांसारख्या खेळाडूंना टी-२० संघातून वगळल्यानंतर उथप्पाने आपल्या युट्यूब चॅनेलवर नाराजी प्रकट केली. विशेषत: टीम इंडियाचा वनडे कॅप्टन शुभमन गिल याला अशा प्रकारे बाहेर ठेवणं धक्कादायक असून यामुळे खेळाडूंमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होऊ शकते, असा इशारा उथप्पाने दिला आहे. रॉबिन उथप्पाने आपल्या चॅनेलवर म्हटलं की, मफ्भारतीय क्रिकेट ही सध्या एक अनोखी जागा बनली आहे. आपण विचार करतो की एखादा अंदाज काम करेल आणि अचानक टीमची घोषणा होते. मी असे म्हणत नाही की ही टीम चांगली नाही. ही खूप चांगली टीम आहे, पण नक्कीच काही जणांची मने तुटली आहेत आणि अशा वेळी चांगले वाटत नाही. जो कोणी क्रिकेट खेळतो, त्याला माहित आहे की शुभमन गिल आणि जितेश शर्मा यांना किती वाईट वाटत असेल. माझी सहानुभूती त्यांच्यासोबत आहे.शुभमन गिलच्या निवडीवर बोलताना उथप्पा पुढे म्हणाला की, मफ्शुभमन गिलसाठी तुम्हाला वाईट वाटतं कारण तो टेस्ट आणि वनडे टीमचा कॅप्टन आहे. हे खूप वाईट दृश्य आहे. मला वाटलं होतं की दुसऱ्या कोणाला तरी व्हाईस कॅप्टन बनवले जाईल असे व्यक्त केली आहे.

### गुजरात टायटन्सच्या १८ कोटींच्या खेळाडूच्या जीवाला कुणापासून धोका?

मुंबई-आगामी आयपीएलसाठी लिलाव पूर्ण झाली असताना आता सर्वांना पहिल्या सामन्याची उत्सुकता लागली आहे. अशातच आता गुजरात टायटन्सच्या स्कॉडमधून धक्कादायक माहिती समोर येतीये. इंग्लंडचा स्टार खेळाडू केविन पीटरसनने त्याच्या सोशल मीडियावर संभाषणाची एक व्हिडिओ क्लिप शेअर केली आहे. यामध्ये गुजरात टायटन्सच्या एका खेळाडूने खळबळजनक खुलासा केलाय. गुजरात टायटन्सच्या खेळाडूला कुणापासून धोका? गुजरात टायटन्सच्या या खेळाडूने स्वत:च्या सुरक्षेसाठी बुलटप्रुफ कार घेतली आहे. मी त्याशिवाय प्रवास करू शकत नाही, असं म्हणत त्याने कारण देखील सांगितलं. त्यामुळे त्याला कुणापासून धोका आहे? असा सवाल विचारला जातोय. गुजरात टायटन्सचा हा खेळाडू दुसरा तिसरा कुणी नसून राशीद खान आहे. राशीद खान याने बुलेटप्रूफ कार खरेदी केलीये. केविन पीटरसनसोबत बोल-ताना राशीदने मोठा खुलासा केला. राशीद खानकडे सलमान खानपेक्षा भारी बुलेटप्रूफ कार आहे.अफगाणिस्तानात तुझं जीवन कसं आहे? तुसा रस्त्यावर चालणं सोयीचं वाटतं का? असा प्रश्न राशीद खान याला केपीने विच-ारला. प्रश्नच उद्भवत नाही. मी बुटेलप्रुफ गाडीशिवाय बाहेरच निघू शकत नाही, असं राशीद म्हणतो. काबूलमध्ये तुझ्याकडे बुलेटप्रूफ गाडी आहे का? असा सवाल केल्यावर, हो नक्कीच. मी माझ्या बुलेटप्रूफ गाडीने प्रवास करतो.



## श्रीलंकेविरुद्धच्या टी ट्वेंटी मालिकेत भारताचा सलग दुसरा विजय

### भारताचा श्रीलंकेवर ५० चेंडू राखून दणदणीत विजय

### शफाली वर्मा ठरली स्टार; मालिकेत २-०ने आघाडीवर

### शफाली वर्माने नाबाद ६९

**विशाखापट्टणम :** भारतीय संघाने श्रीलंकेविरूद्धच्या दुसऱ्या टी-२० सामन्यातही एकतर्फी विजय मिळवत मालिकेत २-० अशी आघाडी घेतली आहे. भारत आणि श्रीलंका महिला संघांमधील दुसऱ्या टी-२० सामन्यात भारताने शफाली वर्माच्या अर्धशतकी खेळीच्या बळावर दणदणीत विजय मिळवला. दुसऱ्या टी-२० सामन्यात टीम इंडियाने ७ विकेट्सने एकतर्फी विजय मिळवला. यासह टीम इंडियाने पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत २-०ने मजबूत आघाडी मिळवली आहे. भारतीय संघाने गोलंदाजी, फलंदाजी व क्षेत्ररक्षण या तिन्ही विभागात उत्कृष्ट कामगिरी केली आहे.

पहिल्या सामन्याप्रमाणे दुसरा सामनादेखील विशाखापट्टणम येथे खेळवला गेला. या दुसऱ्या सामन्यातही भार-ताने नाणेफेक जिंकत गोलंदाजी घेतली आणि श्रीलंकेला १२८ धावांवर रोखत विजयाच्या दिशेने महत्त्वाचं पाऊल टाकलं. यानंतर फलंदाजीत शफाली वर्मा व जेमिमा रॉड्रीग्ज यांनी संघाला विजयापर्यंत नेलं.

श्रीलंकेने दिलेल्या १२९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताने सावध सुरूवात केली. पण स्मृती मानधना चांगली सुरूवात मिळाल्यानंतर एक षटकार व एका चौकारासह १२ धावा करत झेलबाद झाली. स्मृती व शफाली यांनी पहिल्या विकेटसाठी २९ धावांची भागीदारी केली. यानंतर शफाली वर्मा व जेमिमा रॉड्रीग्ज यांनी संघाच्या डावाची जबाबदारी घेतली. दोघींनीही आक्रमक फलंदाजी करत २७ चेंडूत ५८ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी रचली.

दरम्यान मोठा फटका खेळण्याच्या प्रयत्नात जेमिमा १५ चेंडूत ४ चौकार व एक षटकार लगावत २६ धावा करत झेलबाद झाली. तर शफाली वर्माने उत्कृष्ट अर्धशतक झळकावलं आणि भारताच्या विजयाची स्टार ठरली. शफाली ३४ चेंडूत ११ चौकार व एका षटकारासह ६९ धावा करत नाबाद परतली. तर कर्णधार हरमनप्रीतने १० धावा करत तिला चांगली साथ दिली. यासह भारताने ११.५ षटकांत ५० चेंडू राखत विजय मिळवला.

भारताने नाणेफेक जिंकत श्रीलंकेला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं. श्रीलंकेने पहिल्याच षटकात विकेट गमावली. पण त्यांची कर्णधार चमारी अट्टापटू हिने आक्रमक फटकेबाजी केली. पण स्नेह राणाच्या गोलंदाजीवर चमारी २४ चेंडूत ३१ धावा करत झेलबाद झाली. यानंतर हसिनी परेरा व हर्षिता समरविक्रमा यांनी ४४ धावांची भागीदारी रचली. पण अमनजोत व ऋचाने हर्षिताला धावबाद करत ही भागीदारी तोडली आणि यानंतर संघाने लागोपाठ विकेट्स गमावल्या.

भारताकडून पदार्पण केलेल्या वैष्णवी शर्मा हिने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील पहिली विकेट मिळवली. तिने या सामन्यात २ विकेट्स घेतल्या. तर श्रीचरणीने देखील २ विकेट्स घेतल्या आहेत. याशिवाय स्नेह राणा व क्रांती गौड यांनी प्रत्येकी १-१ विकेट्स घेतल्या. तर ऋचा घोषने या सामन्यात ३ धावबाद केले.

## नीरज चोप्रा यांनी पंतप्रधानांची भेट घेतली



नवी दिल्ली-नीरज चोप्रा आणि त्यांच्या पत्नी हिमानी मोर यांनी आज नवी दिल्लीत ७, लोक कल्याण मार्ग येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. मफ्आमचा विविध मुद्द्यांवर चांगला संवाद झाला, अर्थातच खेळांवरही!, पंतप्रधान मोदी म्हणाले.
पंतप्रधानांनी एक्स वर पोस्ट केले आहे:मफ्नीरज चोप्रा आणि त्यांची पत्नी हिमानी मोर यांची आज ७, लोककल्याण मार्ग येथे भेट घेतली.खेळांसह विविध मुद्द्यांवर आमचा चांगला संवाद झाला !

## प्रत्येक बॉल सिक्स गेला पाहिजे नाही-तर..., वडिलांनी दिली होती धमकी

दिल्ली : इंडियन प्रीमियर लीगच्या मिनी-लिलावात पाच वेळा विजेत्या चेन्नई सुपर किंग्जने १४.२० कोटी रुपयांना खरेदी केल्यानंतर १९ वर्षीय कार्तिक शर्माला अश्रू अनावर झाले होते. कार्तिक आयपीएलच्या इतिहासात सर्वाधिक मानधन घेणारा अनकॅप्ड खेळाडू बनला आहे. अशातच आता एका मुलाखतीमध्ये बोलताना चेन्नईचा युवा स्टार कार्तिक शर्माने मोठा खुलासा केलाय. एवढ्या कमी वयात तुझ्यात सिक्स हिटिंगची कला कशी जमली? असा सवाल समालोचक जतीन सपरू याने विचारला. त्यावर कार्तिक शर्माने उत्तर दिलं. माझ्या वडिलांनी माझ्याकडून तयारी करून घेतली होती. त्यांना आक्रमक बॅटिंग आवडते. बॉल जर डिफेन्स केला तर मी तुला मारेन, असं धमकी माझ्या वडिलांन मला दिली होती, असं कार्तिक शर्मा म्हणाला. माझे वडील नेहमी म्हणायचे प्रत्येक बॉल मारून खेळायचा. मी लहान असल्यापासून त्यांनी मला सांगितले होते की, प्रत्येक बॉल स्टेडियममध्ये पोहोचायला हवी, असे कार्तिक म्हणाला. त्यावर समालोचक जतीनने प्रश्न केला की, वडील सांगत होते पण कोचने सांगितले नाही का? की डिफेन्स कर... हळू खेळ किंवा आणखी काही...



त्यावर कार्तिक म्हणतो, दिवसा डिफेन्सचा सराव करत होते तरी देखील वडील रात्री फक्त सिक्स मारण्याचा सराव घ्यायचे, म्हणून मी आज इथंपर्यंत पोहोचू शकलो, असे कार्तिक म्हणाला. कार्तिकच्या वडिलांनी माध्यमांना सांगितले की एकदा तो कार्तिकसोबत ग्वाल्हेरमध्ये एका स्पर्धेत खेळण्यासाठी गेला होता तेव्हा पैसे संपले अन् त्यांना हॉटेल सोडून रात्रीच्या निवारामध्ये राहावे लागले आणि रात्र उपाशी काढावी लागली. नंतर, संघाने अंतिम सामना जिंकला. कार्तिकला क्रिकेटपटू बनवण्यासाठी त्याच्या वडिलांनी कर्जही घेतले. त्यांनी एक बॉलिंग मशीन विकत घेतली आणि त्याला सराव करायला लावला.

## वैभव सूर्यवंशी, आयुष म्हात्रेसह प्रशिक्षकांवरही कारवाई होणार

### फायनलमध्ये दारुण पराभव होताच बीसीसीआय ॲक्शन मोडवर!



मुंबई -पाकिस्तानविरुद्ध अंडर-१९ आशिया कपच्या अंतिम सामन्यात झालेल्या दारुण पराभवानंतर भारतीय क्रिकेट नियामक मंडळ पूर्णपणे ॲक्शन मोडमध्ये आले आहे. या पराभवामागची नेमकी कारणे शोधण्यासाठी बीसीसीआयकडून संपूर्ण संघाच्या कामगिरीचा सखोल आढावा घेतला जाणार आहे. २२ डिसेंबर रोजी झालेल्या बोर्डाच्या एपेक्स कौन्सिलच्या बैठकीत याबाबत महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला.
अंतिम सामन्यात भारताला पाकिस्तानकडून तब्बल १९१ धावांनी पराभव पत्करावा लागला. स्पर्धेत आतापर्यंत दमदार कामगिरी करणारा भारतीय संघ निर्णायक सामन्यात मात्र पूर्णपणे कोलमडलेला दिसला. गोलंदाजी अपेक्षेप्रमाणे प्रभाव टाकू शकली नाही, तर फलंदाजी पूर्णपणे अपयशी ठरली. त्यामुळे बीसीसीआयकडून केवळ आढावा घेण्यापुरते न थांबता, टीम मॅनेजमेंटकडून पराभवाबाबत सविस्तर स्पष्टीकरण मागवले जाणार आहे.
आयुष म्हात्रेच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने अंतिम फेरीपर्यंत मजल मारताना एकही सामना गमावला नव्हता. मात्र, विजेतेपदाच्या सामन्यात संघाचा आत्मविश्वास ढासळलेला दिसला. निर्णायक क्षणी अनुभवी आणि आघाडीच्या खेळाडूंनी अपेक्षित कामगिरी न केल्याने संघावर दबाव वाढत गेला.बीसीसीआय अंडर-१९ संघाचे मुख्य प्रशिक्षक ऋषिकेश कानिटकर आणि कर्णधार आयुष म्हात्रे यांच्याशी अंतिम सामन्यातील कामगिरीवर थेट चर्चा करणार आहे. ही चर्चा टीम परफॉर्मन्स रिव्ह्यूचा महत्त्वाचा भाग असणार असून, भविष्यातील धोरणांवरही त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे.
दरम्यान, अंतिम सामन्यात वैभव सूर्यवंशी आणि आयुष म्हात्रे यांच्या वर्तणुकीबाबतही बीसीसीआयने नाराजी व्यक्त केल्याची माहिती आहे. या मुद्द्यावर स्वतंत्र चर्चा होऊ शकते आणि आवश्यक असल्यास कारवाईचाही विचार केला जाऊ शकतो. मात्र, हा मुद्दा अधिकृत रिव्ह्यू प्रक्रियेचा भाग आहे की नाही, याबाबत अद्याप स्पष्ट माहिती समोर आलेली नाही. भारतीय अंडर-१९ संघाला येत्या काळात झिम्बाब्वे आणि नामीबिया येथे होणाऱ्या अंडर-१९ विश्वचषकात सहभागी व्हायचे आहे. त्या स्पर्धेसाठी संघाची घोषणा अद्याप झालेली नसल्याने, विश्वचषकापूर्वीच आशिया कपमधील पराभवाचा आढावा पूर्ण करण्यावर बीसीसीआयचा भर आहे. भविष्यात अशा मोठ्या अपयशाला सामोरे जावे लागू नये, यासाठी ही समीक्षा महत्त्वाची मानली जात आहे.

## २८ वर्षीय गोलंदाजाची रेकॉर्ड ब्रेकिंग गोलंदाजी; टी-२० क्रिकेटमध्ये पहिल्यांदाच असे घडले

दिल्ली-टी-२० क्रिकेट हा फलंदाजांचा खेळ आहे, असे म्हटले जाते. कारण फलंदाज प्रत्येक चेंडूवर मोठे फटके मारण्याच्या प्रयत्नात असतात. त्यामुळे गोलंदाजी करताना २ किंवा ३ गडी बाद करणं ही कुठल्याही गोलंदाजासाठी मोठी गोष्ट असते. पण जर एखाद्या गोलंदाजाने हॅट्रिक घेतली, तर मग सोन्याहून पिवळे होऊन जाते. पण टी-२० क्रिकेटमध्ये गोलंदाजी करताना इंडोनेशियाच्या गोलंदाजाने एकाच षटकात ५ गडी बाद करून टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील मोठ्या विक्रमाला गवसणी घातली आहे. इंडोनेशिया आणि कंबोडिया या दोन्ही संघांमध्ये ८ टी-२० सामन्यांची मालिका सुरू आहे. या मालिकेतील पहिला सामना २३ डिसेंबरला बालीमध्ये पार पडला. या सामन्यात कंबोडियाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. या सामन्यात पहिल्या डावात फलंदाजी करण्यासाठी इंडोनेशियाकडून धर्म केसमाने दमदार शतकी खेळी केली. त्याने ८ चौकार आणि ६ षटकारांच्या साहाय्याने ११० धावांची खेळी केली. या खेळीच्या बळावर इंडोनेशियाने ५ गडी बाद १६७ धावांचा डोंगर उभारला. कंबोडियाला हा सामना जिंकण्यासाठी १६८ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना कंबोडियाने १४.३ षटकांपर्यंत १०४ धावा केल्या होत्या. त्यानंतर इंडोनेशियाकडून १६ वे षटक टाकण्यासाठी २८ वर्षीय गेडे प्रियांदना गोलंदाजीला आला. या षटकातील सुरूवातीच्या ३ चेंडूंवर त्याने ३ फलंदाजांना माघारी धाडलं. यासह त्याने हॅट्रिक पूर्ण केली. त्यानंतर पाचव्या आणि सहाव्या चेंडूवर त्याने आणखी २ फलंदाजांना पॅव्हेलियनची वाट दाखवली. यासह तो टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एकाच षटकात ५ गडी बाद करणारा तो पहिलाच गोलंदाज ठरला आहे. ाअ-ाधी महिला आणि पुरुषांच्या टी-२० क्रिकेटमध्ये कुठल्याही गोलंदाजाला एकाच षटकात ५ गडी बाद करता आले

## ॲशेस कसोटी मालिकेदरम्यान दारू पार्टी आणि, इंग्लंड क्रिकेट संघ वादात अडकला

दिल्ली-इंग्लंड संघासाठी २०२५-२६ ॲशेस मालिका एखाद्या वाईट स्वप्नास-ारखी ठरली आहे. ऑस्ट्रेलियात सुरू असलेल्या ॲशेस मालिकेतील पहिल्या तीन सामन्यांमध्ये ऑस्ट्रेलियाने एकतर्फी विजय मिळवत मालिका आपल्या नावे केली आहे. इंग्लंडचा संघ एकही सामना जिंकू शकला नाही, यामुळे संघावर व संघ व्यवस्थापनावर टीका होत आहे. यादरम्यान संघ नव्या वादात अडकला आहे.
पहिल्या तीन सामन्यांमधील पराभव, सलग पाचव्या ॲशेस ट्रॉफीचा पराभव, मार्क वूड संपूर्ण मालिकेतून बाहेर आणि आता संघावर अनेक आरोप होत आहेत. दुसऱ्या आणि तिसऱ्या कसोटी सामन्यादरम्यान इंग्लंड क्रिकेट संघाच्या खेळाडूंवर मद्यपान करून पार्टी केल्याचा आरोप आहे. संघाचे व्यवस्थापकीय संचालक रॉब की यांनी या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.





रिपोर्ट्सनुसार, इंग्लंडच्या खेळाडूंवर ब्रिस्बेन कसोटीनंतर आणि ॲडलेड कसोटीपूर्वी नूसा येथे पार्टी केल्याचा आणि अति मद्यपान केल्याचा आरोप आहे. रॉब की यांनी या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत आणि त्यांचे मतही व्यक्त केले आहे.
इंग्लंडने ॲडलेडमधील तिसऱ्या कसोटी सामन्यापूर्वी विश्रांतीदरम्यान वातावरण पुन्हा नॉर्मल करण्यासाठी क्वीन्सलँडच्या किनाऱ्यावर रवाना झाले. खेळाडूंनी जास्त मद्यपान केल्याच्या वृत्तानंतर की यांनी संघाने घेतलेल्या विश्रांतीचा बचाव केला. परंतु ॲडलेडमधील तिसऱ्या कसोटी सामन्यासाठी संघाने चांगली तयारी केली का

### मॅनेजमेंटने दिले चौकशीचे आदेश

यावर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. बीबीसीच्या अहवालानुसार, ''संघातील काही खेळाडूंनी ब्रिस्बेनमध्ये सलग दोन दिवस मद्यपान केल्यानंतर नूसा येथे आणखी चार दिवस पार्टी केली. म्हणजेच या दौऱ्यातील सामन्यापूर्वी जेवढे कसोटी क्रिकेट खेळले गेले, तेवढ्याच म्हणजे सहा दिवस खेळाडूंनी मद्यपानात घालवले.''
अहवालात पुढे नमूद करण्यात आलं आहे की, ''इंग्लंडचा संघ अजिबात लपूनछपून वागत नव्हता. रस्त्याच्या कडेला बसून मद्यपान सुरू होतं आणि अनेक खेळाडूंनी पारंपरिक अकुब्रा हॅट घातली होती, जी जणू त्यांच्या सुट्टीचा 'युनिफॉर्म'च बनली होती.''
या प्रकरणावर भाष्य करताना रॉब की म्हणाले, ''जर आमचे खेळाडू बाहेर जाऊन अति मद्यपान करत असल्याचं लोक सांगत असतील, तर अर्थातच आम्ही त्याची चौकशी करू. मी स्वत: मद्यपान करत नाही. आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळणाऱ्या संघाकडून जास्त प्रमाणात मद्यपान होणे, कोणत्याही टप्प्यावर मला अपेक्षित नाही. आम्ही अतिरिक्त सुरक्षा व्यवस्था ठेवली आहे. नेमके काय घडले, हे शोधण्यासाठी आमच्याकडे पुरेसे मार्ग आहेत. आतापर्यंत मला जी माहिती मिळाली आहे, त्यानुसार खेळाडूंनी एकत्र बसून जेवण केले, दुपारचे आणि रात्रीचे जेवण केले, फार उशिरापर्यंत बाहेर गेले नाहीत. त्यात मला काही गैर वाटत नाही.''
ॲशेस मालिकेसाठी ऑस्ट्रेलियात दाखल होण्याआधीच इंग्लंडने हॅरी ब्रूक आणि जेकब बेथेल या दोन खेळाडूंना संघातून वगळलं होतं. न्यूझीलंडमध्ये अंतिम वनडेच्या आदल्या रात्री हे दोघे मद्यपान करताना आढळल्याने हा निर्णय घेण्यात आला होता. दरम्यान, मालिकेदरम्यान विश्रांती घेणं अत्यावश्यक असल्याचं मत रॉब की यांनी व्यक्त केलं.
की म्हणाले, ''हॅरी ब्रूक संपूर्ण हिवाळ्यादरम्यान केवळ सहा दिवस घरी घालवणार आहे. जोफ्रा आर्चर थेट विश्व-चषक आणि आयपीएल खेळणार आहे. त्यामुळे विशेषत: मल्टी-फॉरमॅट खेळणाऱ्या क्रिकेटपटूंना थोडा ब्रेक घेणं, सामान्य आयुष्य जगणं फार गरजेचे आहे. मात्र जर हे मद्यपान अति प्रमाणात झालं आणि ते जणू एखाद्या स्टॅग पार्टीसारखे असेल, तर ते पूर्णपणे अस्वीकार्य आहे. मद्यप-ानाची संस्कृती कुणाच्याही फायद्याची ठरत नाही.''

## अखिल भारतीय ओबीसी सेवा उपाध्यक्षपदी मनोज पोतदार यांची निवड

**लातूर/प्रतिनिधी :** अखिल भारतीय ओबीसी सेवा संघ महाराष्ट्रराज्य लातूर शहर ओ.बी.सी. सेवा संघाच्या उपाध्यक्षपदी मनोज हरिभाऊ सुवर्णकार पोतदार यांची निवड.



महपुरुषाचे कार्य व विचार समाजापर्यंत पोहचविणे, समाजाचे प्रश्न सोडवणे, राष्ट्रीय एकात्मता, राष्ट्रीय भावना, सामाजिक बांधिलकीची भावना वाढीस लावण्याच्या दृष्टीने कार्य करणे. शेतकऱ्याचे प्रश्न सोडविणे व त्यांना न्याय देणे. राष्ट्रीय सण साजरे करणे या उद्देशाने संघाची स्थापना करण्यात आलेली आहे.

अखिल भारतीय ओबीसी सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष हणमंत सुतार प्रदेशअध्यक्ष तात्यासाहेब देढे आणि राज्य केअर कमिटीचे सदस्य तथा पुणे जिल्हाध्यक्ष प्रा. नानासाहेब टेंगले यांच्या बैठकीत लातूर शहर उपाध्यक्षपदी मनोज हरिभाऊ सुवर्णकार पोतदार यांची निवड करण्यात आली. अखिल भारतीय ओबीसी समाजाला न्याय मिळवून देणार.

## ध्यानामुळे मानसिक शांती आणि स्थिरता प्राप्त होते. - नंदिनी पडिले यांचे प्रतिपादन



**लातूर/प्रतिनिधी :** ऑफीसर्स कल्ब जिल्हाधिकारी कार्यालय येथे ध्यान दिवस २१ डिसेंबर जागतिक ध्यान दिवसा निमित्त सनराईज योगा स्टुडिओच्या संचालिका नंदिनी पडिले व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी मिळून ऑफीसर्स कल्ब जिल्हाधिकारी कार्यालय येथे ध्यान दिवस साजरा केला. सर्वांनी सूर्योदयापूर्वी एकत्र येऊन सामुहिक सूर्यनमस्कार करत या दिवसाची सुरुवात केली.



सनराईज योगा स्टुडिओच्या वत्तीने हा अंतरराष्ट्रीय ध्यान दिवस मागील वर्षापासून साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्र महासभेने ६ डिसेंबर २०२४ रोजी सर्वसहमतीने २१ डिसेंबर हा दिवस जागतिक ध्यान दिवस म्हणून घोषित केला. यावेळी संचालिका नंदिनी पडिले म्हणाल्या अश्या पध्दतीने सामुहीकपणे हा दिवस आम्ही साजरा करत आहोत.या दिवसाचा उद्देश ध्यानाच्या लाभांबद्दल जागरूकता वाढवणे आणि मानसिक शांति आणि समृद्धीला प्रोत्साहन देणे आहे. सनराईज योगा स्टुडिओच्या सर्व सहकाऱ्यांनी सकाळी पहाटे ६.३० वाजता ऑफिसर्स कल्ब जिल्हाधिकारी कार्यालय येथे एकत्र येऊन जागतिक ''मेडीटेशन डे'' ध्यान दिवस साजरा केला. मानसिक शांति, ध्यानामुळे मानसिक शांति आणि स्थिरता प्राप्त होते. नियमित ध्यानामुळे शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य पण सुधारते असे नंदिनी पडिले यांनी याप्रसंगी सांगितले.

## स्थानिक स्वराज्य संस्था सार्वत्रिक निवडणुकीत नमुना मतपत्रिका छपाईवर निर्बंध

**लातूर/प्रतिनिधी :** राज्य निवडणूक आयोगाने १५ डिसेंबर २०२५ रोजी लातूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम घोषित केला आहे. त्याच दिवशीपासून या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. ही निवडणूक संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्यासाठी या निवडणूक काळात नमुना मतपत्रिका छपाईबाबत निर्बंध घालण्यात आले आहेत. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी किंवा त्यांच्या हितचिंतकाने मुद्रणालयाचे मालकाने व इतर सर्व माध्यमाद्वारे छपाई करणाऱ्या मालकाने तसेच प्रकाशकाने नमुना मतपत्रिका छापतांना इतर उमेदवाराचे नाव व त्यांनी नेमून देण्यात आलेले चिन्ह वापरणे, नमुना मतपत्रिकेसाठी आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे कागद वापरणे व आयोगाने निश्चित केलेल्या कागदाच्या आकारामध्ये नमुना मतपत्रिका छापणे या बाबींवर निर्बंध घालण्यात आले आहेत. भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये जिल्हादंडाधिकारी यांनी नमुना मतपत्रिका छपाईस निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घालण्यात येत असल्याचे आदेश निर्गमित केले आहेत.

# उच्च शिक्षणातील विद्यार्थ्यांची अनुपस्थिती : गंभीर समस्या

## अभाविपचा शास्त्रशुद्ध सर्वेक्षण अहवाल प्रसिद्ध

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** - महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या अनुपस्थितीबद्दल अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने मराठवाडा आणि खान्देश स्तरावर केलेल्या सर्वेक्षणाच्या अहवालातून उच्च शिक्षण व्यवस्थेत अनेक अमूलाग्र बदल आवश्यक असल्याची जाणीव प्रकर्षाने जाणवते असे मत अनुपस्थिती सर्वेक्षण विषयात गठीत तज्ञ समितीचे अध्यक्ष प्रा.अनिल राव यांनी व्यक्त केले.




अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, देवगिरी प्रदेशाच्या विविध कार्यकारिणी बैठकींमध्ये महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांच्या वाढत्या अनुपस्थितीचा मुद्दा सातत्याने चर्चेत येत होता. कोविड -१९ नंतर उच्च शिक्षण क्षेत्रात विद्यार्थ्यांची उपस्थिती लक्षणीयरीत्या घटली असून त्याचा थेट परिणाम शैक्षणिक गुणवत्ता, मानसिक स्वास्थ्य व सामाजिक जडणघडणीवर होत असल्याचे स्पष्ट झाले आहे. या पार्श्वभूमीवर अभाविपने ही समस्या गांभीर्याने घेत शास्त्रशुद्ध पद्धतीने सर्वेक्षण करून सविस्तर अहवाल तयार केला आहे.

कोविडनंतर दीर्घकालीन ऑनलाइन शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचा महाविद्यालयीन परिसराशी थेट संपर्क कमी झाला. सह-अभ्यासक्रम, क्रीडा, सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमांतील सहभाग घटलेला दिसून येत आहे. याच कालखंडात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणीचा टप्पा सुरू असल्याने शिक्षणव्यवस्था अधिक विद्यार्थी-केंद्रित व सर्वांगीण करण्याची आवश्यकता अधोरेखित झाली आहे. या सर्वेक्षणात विद्यार्थी, पालक, प्राध्यापक, प्राचार्य, संस्थाचालक व विद्यापीठ प्राधिकरण अधिकारी अशा सहा प्रमुख हितधारकांचा सहभाग घेण्यात आला. प्रश्नावली, प्रत्यक्ष संवाद, तसेच शिक्षणतज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली माहिती संकलन व विश्लेषण करण्यात आले. अभाविपच्या विद्यार्थी व प्राध्यापक कार्यकर्त्यांनी या प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेतला.

अहवालातील प्रमुख निरीक्षणांनुसार बहुसंख्य विद्यार्थी सामाजिक-आर्थिकदृष्ट्या दुर्बल पार्श्वभूमीतील आहेत. अध्यापन प्रक्रिया पुरेशी आकर्षक नसणे, ऑनलाइन साहित्यामुळे प्रत्यक्ष वर्ग उपस्थितीची गरज कमी भासणे, उपस्थिती नियमांतील शिथिलता, आर्थिक अडचणी, प्रवास व कौटुंबिक कारणे ही अनुपस्थितीची प्रमुख कारणे ठरत आहेत. आधुनिक अध्यापन पद्धती, खउढ चा प्रभावी वापर, रोजगाराभिमुख अभ्यासक्रम व कडक उपस्थिती धोरणांची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली आहे.

या अहवालाच्या आधारे अभाविपने पुढील कृती आराखडा निश्चित केला असून महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठे व संलग्न महाविद्यालय परिसर, जिल्हा व तालुका स्तरावर संवाद कार्यक्रम व जनजागृती मोहिमा राबविण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांच्या मानसिक, सामाजिक व शैक्षणिक विकासासाठी पूरक उपक्रम राबविले जातील. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितासाठी रचनात्मक आंदोलनाचा मार्गही स्वीकारण्यात येईल. हा अहवाल महाराष्ट्र शासन तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाकडे सादर करण्यात येणार आहे. अभाविपचा हा अहवाल उच्च शिक्षणातील सद्यस्थिती, आव्हाने व सुधारणा यांचा वस्तुनिष्ठ आढावा मांडतो. शासन व शैक्षणिक परिवाराच्या समन्वयातून विद्यार्थी-केंद्रित, गुणवत्ताधिष्ठित व परिणामाभिमुख शिक्षणव्यवस्था उभारण्यासाठी हा अहवाल मार्गदर्शक ठरेल असा विश्वास आहे.

राज्य शासन, विद्यापीठ व महाविद्यालयाने या समस्येकडे सकारात्मक दृष्टिकोनातून विचार करत अनुपस्थिती सुधारण्यासाठी विशेष अभियान व कृती कार्यक्रम आखावा आणि या कृती कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अखिल भारतीय विद्यार्थी परिषद सक्रिय सहभाग नोंदवेल असे मत प्रदेश मंत्री वैभवी ढिवरे यांनी व्यक्त केले. या पत्रकार परिषदेस अभाविप देवगिरी प्रदेश अध्यक्ष प्रा. डॉ. सचिन कंदले उपस्थित होते.

## स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार प्रवेशिका व पुस्तके पाठविण्याचा कालावधी ०१ ते ३० जानेवारी २०२६

**मुंबई/प्रतिनिधी :** मराठी भाषेतील उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीसाठी प्रकाशन वर्ष २०२५ करिता राज्य शासनाच्यावतीने देण्यात येणाऱ्या स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कारांसाठीच्या प्रवेशिका जिल्हाधिकारी कार्यालयात (मुंबई शहर व मुंबई उपनगर हे दोन जिल्हे वगळून), तसेच महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या कार्यालयात दिनांक १ जानेवारी, २०२६ ते ३० जानेवारी २०२६ पर्यंत पाठविता येणार आहेत. दिनांक १ जानेवारी, २०२५ ते ३१ डिसेंबर, २०२५ या कालावधीत प्रकाशित झालेली प्रथम आवृत्ती पुस्तके या स्पर्धेसाठी पात्र आहेत.

या स्पर्धेची नियमावली व प्रवेशिका सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रवींद्र नाट्यमंदिर इमारत्त, दुसरा मजला, सयानी मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५ यांच्या कार्यालयात तसेच मुंबई शहर व मुंबई उपनगर हे दोन जिल्हे वगळता अन्यत्र संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात (सर्वसाधारण शाखा अथवा करमणूक शाखा) विनामूल्य उपलब्ध होतील.

महाराष्ट्र शासनाच्या www. maharashtra.gov.in या संकेतस्थळावर नवीन संदेश या सदरात स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार २०२५ नियमावली व प्रवेशिका या शीर्षाखाली व 'What's new या सदरात 'Late Yashwantrao Chavan State Literature Award २०२५ Rules Book and Application Form' या शीर्षाखाली व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या http:// sahitya.marathi.gov. in या संकेतस्थळावर प्रवेशिका व नियमपुस्तिका उपलब्ध होतील, प्रवेशिका पूर्णतः भरुन आवश्यक साहित्यासह सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या कार्यालयात दिनांक १ जानेवारी, २०२६ ते ३० जानेवारी २०२६ या विहित कालावधीत पोहचतील अशा बेताने पाठवाव्यात.

लेखक / प्रकाशक या स्पर्धे साठी प्रवेशिका दाखल करु शकतात. मुंबई शहर व मुंबई उपनगर या दोन जिल्ह्यातील लेखक /प्रकाशकांनी पुस्तकांच्या दोन प्रतींसह विहित नमुन्यातील प्रवेशिका सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला, सयानी मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५ येथे पाठवाव्यात. मुंबई शहर व मुंबई उपनगर हे दोन जिल्हे वगळून अन्य ठिकाणच्या लेखक / प्रकाशकांनी संबंधित जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये हे साहित्य दिनांक १ जानेवारी, २०२६ ते ३० जानेवारी २०२६ या विहित कालावधीत पाठवावे, असे आवाहन सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांनी केले आहे.

लेखक / प्रकाशकांनी मंडळाकडे प्रवेशिका व पुस्तके पाठविताना सदर बंद लिफाफ्यावर / पाकीटावर स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार २०२५ साठी प्रवेशिका असा स्पष्ट उल्लेख करावा. प्रवेशिका व पुस्तके स्वीकारण्याचा अंतिम दिनांक ३० जानेवारी, २०२६ हा राहील.

विहित कालमर्यादेनंतर (१ जानेवारी, २०२६ ते ३० जानेवारी २०२६) येणाऱ्या प्रवेशिका स्पर्धे साठी स्वीकारल्या जाणार नाहीत, असे सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांनी कळविले आहे.

## क्रिकेट स्पर्धेत सुशील इलेव्हनचा विजयी जल्लोष!



**लातूर/प्रतिनिधी :** मैत्री क्रिकेट क्लब आयोजित क्रिकेट स्पर्धा दयानंद मैदानावर मोठ्या उत्साहात पार पडली. या रोमांचक स्पर्धेत सुशील इलेव्हन संघाने प्रभावी खेळ करत विजेतेपद पटकावले, तर अलीम इलेव्हन संघ उपविजेता ठरला.

स्पर्धेतील सामन्यांदरम्यान चौकार-षटकारांचा वर्षाव आणि गोलंदाजांच्या अचूक चेंडूंनी मैदानात उत्साहाचे वातावरण निर्माण केले. प्रेक्षकांच्या टाळ्यांच्या गजरात प्रत्येक सामना रंगतदार ठरला.

**सिरीजमधील उत्कृष्ट प्रदर्शने:**

मालिकावीर,उत्कृष्ट फलंदाज : प्रसाद साठे

सामनावीर: माधव गोमारे

उत्कृष्ट क्षेत्ररक्षक: विशाल कांबळे

उत्कृष्ट गोलंदाज: जब्बार बागवान

स्पर्धेच्या समारोप प्रसंगी पारितोषिक वितरण समारंभात मैत्री क्रिकेट क्लबचे पदाधिकारी, मान्यवर व क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विजेत्या व उपविजेत्या संघांना आकर्षक ट्रॉफी आणि वैयक्तिक पारितोषिके देण्यात आली.

या स्पर्धेमुळे लातूर शहरातील क्रिकेटप्रेमींना थरारक आणि अविस्मरणीय अनुभव मिळाला. तरुण खेळाडूंच्या जिद्दीचा आणि संघभावनेचा प्रत्यय मैदानावर प्रत्येक क्षणी जाणवला.

## सुधारित पायाभूत सुविधांनीसुसज्ज असलेल्या सोलापूर विभागाच्या भिगवणमालधक्क्यातुन

**सोलापूर/प्रतिनिधी :** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने मालवाहतूक हाताळण्याची क्षमता वाढवण्यासाठी आणि ग्राहकांसाठी व्यवसाय सुलभता सुधारण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकत, भिगवण मालधक्का (गुड्स शेड) मधील पायाभूत सुविधा यशस्वीरित्या कार्यान्वित केल्या आहेत. या उपक्रमाचा एक भाग म्हणून, पुणे कडे जाणारी होल्डिंग लाईन मालवाहतूक ग्राहकांसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे, ज्यामुळे रेल्वेचे संचालन अधिक सुरळीत आणि कार्यक्षम होईल.



अंतिम टप्प्यातील कनेक्टिव्हिटी आणि कामकाजातील सुलभता वाढवण्यासाठी भिगवण गुड्स शेड येथे महत्त्वाचे पायाभूत सुविधा सुधारणांचे काम पूर्ण झाले आहे. यामध्ये सुमारे १८००० चौरस मीटरच्या परिसराचे महत्त्वपूर्ण विस्तारीकरण, तसेच सुमारे १०० मीटर बाय ९ मीटरचा सुव्यवस्थित संपर्क रस्ता विकसित करण्याचा समावेश आहे. या सुधारणांचा उद्देश वाहनांची सहज वाहतूक सुलभ करणे, गर्दी कमी करणे आणि मालाच्या चढ-उताराच्या कामांसाठी जलद प्रक्रिया सुनिश्चित करणे हा आहे. याव्यतिरिक्त, सर्व मूलभूत सुविधांसह एक व्यापारी कक्ष, एक हमाल कक्ष आणि रेल्वे कार्यालय देखील बांधकामाधीन आहे.

ही कामे पूर्ण झाल्यानंतर, भिगवण येथील मालवाहतूक कार्यांना नवी गती मिळाली आहे. हावडा विभागातील (पश्चिम बंगाल) डंकुनी येथे जाणाऱ्या रेकच्या आगमनानंतर भिगवण गुड्स शेडमधून साखरेची लोडिंग सुरू झाली आहे, ज्यामुळे महाराष्ट्रातील साखर उत्पादक प्रदेश आणि पूर्व भारतातील बाजारपेठा यांच्यात एक महत्त्वाचा दुवा निर्माण झाला आहे.

सुधारित सुविधांचे फायदे स्पष्ट करताना, वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक श्री. योगेश पाटील यांनी सोलापूर व आसपासच्या परिसरातील साखर व्यापारी तसेच मालवाहतूक ग्राहकांना भिगवण गुड्स शेडमधील नव्याने विकसित पायाभूत सुविधांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. या सुविधांमुळे विश्वासार्ह, कार्यक्षम आणि किफायतशीर लॉजिस्टिक सेवा उपलब्ध होऊन प्रादेशिक व्यापार व आर्थिक वाढीस चालना मिळेल, असे त्यांनी नमूद केले.


भारतीय रेल्वेच्या रेल्वे-आधारित लॉजिस्टिक्स आणि शाश्वत वाहतुकीला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टिकोनानुसार, सोलापूर विभाग मालवाहतूक पायाभूत सुविधांमध्ये सतत सुधारणा करण्यास आणि ग्राहक-स्नेही सेवा प्रदान करण्यास कटिबद्ध आहे.

## महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे यांच्या हस्ते मध्य रेल्वेची वर्ष २०२६ दिनदर्शिका प्रकाशित


**मुंबई/प्रतिनिधी :** श्री. विवेक कुमार गुप्ता, महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे यांच्या हस्ते दि. २२.१२.२०२५ रोजी मध्य रेल्वेची वर्ष २०२६ ची भिंतीवरील दिनदर्शिका प्रकाशित करण्यात आली.

यंदाची भिंतीवरील दिनदर्शिका ''वंदे मातरम्‌चे १५० ऐतिहासिक वर्षे'' या संकल्पनेवर साकारण्यात आली असून, ''गीतापासूंन आत्म्यापर्यंत संपूर्ण राष्ट्राला एकत्र बांधणारे'' असा आशयपूर्ण मथळा देण्यात आला आहे.

या दिनदर्शिकेच्या एका बाजूला देवनागरी लिपीत लिहिलेला वंदे मातरम्‌चा संपूर्ण मजकूर देण्यात आला आहे, तर दुसऱ्या बाजूला छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसचा भव्य मध्यवर्ती घुमट, त्यासोबत उपनगरीय लोकल रेल्वे आणि वंदे भारत एक्स्प्रेस दर्शविण्यात आली असून, यामधून भारतीय रेल्वेच्या सातत्यपूर्ण विकासाचा व प्रगतीचा प्रतीकात्मक संदेश देण्यात आला आहे. या प्रसंगी श्री. के. के. मिश्रा, उप महाव्यवस्थापक तसेच डॉ. स्वप्नील डी. निला, मुख्य जनसंपर्क अधिकारी, मध्य रेल्वे उपस्थित होते.



प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# न्यायापासून वंचित असलेल्यांना न्याय मिळावा- न्या.प्रसन्न वराळे

## तुळजापूरच्या नूतन न्यायालयीन इमारतीचे उद्घाटन



धाराशिव(जिमाका) दि.२१ डिसेंबर :- अत्यंत देखण्या अशा राज्यातील तालुकास्तरावरील न्यायालयाच्या इमारतीचे तुळजापूर येथे उद्घाटन होत आहे,ही आनंदाची बाब आहे. नुकतेच आपण संविधानाचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे केले.संविधानाच्या तत्वाचे पालन या इमारतीतून करताना न्यायापासून वंचित असलेल्यांना न्याय देण्याचे काम करावे.असे प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री.प्रसन्न वराळे यांनी केले.

२० डिसेंबर रोजी तुळजापूर येथे नूतन न्यायालयीन इमारतीचे उद्घाटन न्या.श्री.वराळे यांच्या हस्ते करण्यात आले. यानिमित्ताने आयोजित कार्यक्रमात श्री.वराळे बोलत होते. अध्यक्षस्थानी मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती श्री.चंद्रशेखर होते.यावेळी मुंबई उच्च न्यायालयाचे न्या.रवींद्र घुगे,न्या.श्रीमती. विभा कंकणवाडी,पालक न्यायमूर्ती शैलेश ब्रम्हे,न्या. किशोर संत,न्या.अरुण पेडणेकर, न्या.वाय. जी.खोब्रागडे,न्या.आर.एम.जोशी,

न्या.मेहरोज अशरफ खान पठाण, न्या.वैशाली जाधव पाटील,प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती.अभिश्री देव यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती होती.

न्या.श्री.वराळे म्हणाले की,समता,न्याय व बंधुता या तत्वावर भारताचे संविधान काम करते. जातीप्रथेमुळे भेदाभेद निर्माण होतो. भेदाच्या ह्या भिंती गळाल्या पाहिजे. त्यासाठी बंधुता आली पाहिजे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जो विचार दिला आहे,तो अत्यंत महत्वाचा आहे. आपण भाग्यवान आहोत की, आपल्याला संतांच्या शिकवणीचा लाभ मिळाला.मात्र त्यांची शिकवण आपण लक्षात घेत नाही.समतेचा संदेश आपल्याला वेगवेगळ्या पद्धतीने दिला जातो.हेच आपल्या संविधानाचे मूलतत्व आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे राज्याचे आराध्य दैवत आहे. जाणता राजा म्हणून त्यांची ओळख आहे.ते उत्तम प्रशासक होते.जगाच्या पाठीवर ग्रेट राजे हे शिवाजी महाराज होते.त्यांना रयतेची काळजी होती.असे त्यांनी सांगितले.

न्याय हा समबुद्धीने दिला पाहिजे असे सांगून न्या.श्री.वराळे म्हणाले की,अन्याय काय झाला आहे हे बघितले पाहिजे. समतोल तत्वाचे पालन करून न्याय दिला पाहिजे.न्याय व्यवस्थेतील अधिकाऱ्यांनी जो न्यायापासुन वंचित आहे, त्यांना न्याय देण्याचे काम करावे.न्याय देताना तो कमी वेळात व कमी खर्चात मिळवून दिला पाहिजे. उत्तम विधीज्ञ न्यायासाठी मदत घेतली पाहिजे. संविधानाच्या तत्वाचे प्रत्येकाने पालन करताना संविधानाच्या तत्वानुसार न्याय दिला पाहिजे.असे न्या.श्री.वराळे यावेळी म्हणाले.

न्या.श्री.चंद्रशेखर म्हणाले की,तुळजापूर न्यायालयाच्या नूतन इमारतीचे आनंदाचा क्षण आहे.अत्यंत देखणी अशी ही वास्तू तयार झाली आहे.तुळजापूर हे ऐतिहासिक ठिकाण आहे. न्यायिक अधिकाऱ्यांच्या संकल्पनेतून व त्यांच्या मेहनतीतून ही वास्तू साकारली आहे.तुळजापूर येथे महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीचे अधिष्ठान आहे.या वास्तूमध्ये कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांना,पक्षकारांना व विधिज्ञ मंडळाच्या सदस्यांना चांगल्या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.आधुनिक व मूलभूत सुविधा इथे आहेत. त्यामुळे नागरिकांना व पक्षकारांना येथून चांगल्या सेवा मिळाल्या पाहिजे.ही नूतन इमारत सर्वांसाठी उपयुक्त ठरेल,असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

न्या.श्री.ब्रम्हे म्हणाले की,मराठवाड्याच्या अडीअडचणीची जाण असलेल्या व इथल्या मातीशी नाळ जुळलेल्या मान्यवरांच्या मार्गदर्शनातून ही देखणी व सर्व सुविधायुक्त अशी वास्तू उभी राहिली आहे.या इमारतीचे पावित्र्य टिकविणे हे इथे काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांचे,पक्षकारांचे ,नागरिकांचे व अधिकाऱ्यांचे काम आहे.भारतीय संविधानातील उद्देशिकेतील मूल्यांची जोपासना या इमारतीतून झाली पाहिजे अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

स्वागतपर भाषणातून प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती.अभिश्री देव यांनी न्यायालयाच्या नूतन इमारतीत उपलब्ध सोयीसुविधांची माहिती दिली.

प्रारंभी न्यायमूर्ती श्री.प्रसन्न वराळे यांनी कोनशिला व फित कापून नूतन इमारतीचे उद्घाटन केले.यावेळी मान्यवरांनी इमारतीतील विविध दालनाची पाहणी केली व विधिज्ञ मंडळाच्या दालनाचे उद्घाटन केले.

मान्यवरांच्या हस्ते मंचावरील भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे पूजन करण्यात आले.यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता एन.व्हि.भंडे,कार्यकारी अभियंता एस.जी.केत,सी. व्ही.चाकोते,उपविभागीय अभियंता व्हि.वाय. आवळे,सहायक अभियंता डी.डी.जंजाळ,कनिष्ठ अभियंता ओ.के.कुलकर्णी,न्यायालयीन इमारतीचे बांधकाम कंत्राटदार डी.एस.हरकुळे व विद्युत कंत्राटदार संतोष कुलकर्णी यांचा मान्यवरांच्या हस्ते शाल,श्रीफळ व भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाला आमदार राणाजगजितसिंह पाटील,महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलचे सदस्य वसंतराव साळुंके,मुंबई उच्च न्यायालयाचे महाप्रबंधक स्वप्निल खटी, मुंबई उच्च न्यायालयाने निवृत्त न्या.के.एल.वड्डे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.यावेळी जिल्ह्यातील न्यायिक अधिकारी,सर्व विधीज्ञ मंडळाचे पदाधिकारी,जिल्हयातील विविध न्यायालयाचे अधिकारी कर्मचारी तसेच सोलापूर व लातूर जिल्ह्यातील विधिज्ञ मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती. तुळजापूर विधीज्ञ मंडळाचे अध्यक्ष ड.दत्तात्रय घोडके यांनी प्रास्ताविक केले. राष्ट्रगीत व राज्यगीताने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.


लातूर समाचार धाराशिव

बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क

9422472502

9175325708


## शाळाबाह्य बिहारमधील तीन विद्यार्थ्यांचा भाटशिरपुरा प्राथमिक शाळेत प्रवेश!



कळंब (प्रतिनिधी)- भाटशिरपुरा शिवरातील दिनेश उद्योजक वाघमारे यांच्या शेतीत काम करणाऱ्या बिहार राज्यामधील पटणा जिल्ह्यातील एका कुटुंबातील ३ शाळाबाह्य विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहामध्ये आणण्यासाठी त्यांच्या वयानुसार जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भाटशिरपूरा शाळेत प्रवेश देऊन शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली आहे.

भाटशिरपुरा गावातील उद्योजक दिनेश वाघमारे यांच्या शेतामध्ये बिहार मधील दुधेला, मनेरा जिल्हा पाटणा येथील बबलू यादव यांचे कुटुंब शेती कामासाठी आले असल्याचे उद्योजक दिनेश वाघमारे यांच्याकडून समजल्यावर . वेळअमावस्या दिवशी शाळेचे मुख्याध्यापक बाळकृष्ण तांबारे व शिक्षक सचिन तामाने शहाजी बनसोडे हे दिनेश वाघमारे यांना भेटण्यासाठी गेले त्यांच्याकडून या ठिकाणी ६ ते १४ वयोगटातील तीन शाळाबाह्य मुले आहेत असे समजले लगेच श्री दिनेश वाघमारे, मुख्याध्यापक बाळकृष्ण तांबारे, सहशिक्षक सचिन तामाने यांनी संबंधित मुलांचे पालक बबलू यादव यांना शिक्षणाचे महत्त्व सांगून आपली मुलं शाळेत घेऊन यावेत व त्यांना प्रवेश घ्यावा अशी विनंती केला असता दिनांक २३ रोजी सुधांशू कुमारी वय ७, कृष्णकुमार वय ८ व करणकुमार वय ९ या तीन विद्यार्थ्यांना इयत्ता पहिली इयत्ता दुसरी व इयत्ता तिसरी मध्ये प्रवेश देऊन त्यांना शिक्षणाच्या प्रवाहामध्ये सामावून घेण्यात आले.

यावेळी त्या सर्व नूतन विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करून गणवेश व पाठ्यपुस्तके वाटप करण्यात आले. यावेळी शाळेतील शिक्षक श्रीकांत तांबारे,अमोल बाभळे, नागेंद्र होसाळे, राजाभाऊ शिंदे, लिंबराज सुरवसे, कालींदा मुंडे, राजकन्या तोडकर, गणपती तापिसे विद्यार्थ्यांचे पालक बबलू यादव उपस्थित होते. याबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, शिक्षणाधिकारी नागेश मापारी गटशिक्षणाधिकारी धर्मराज काळमाते यांनी सर्व शिक्षकांच्या अभिनंदन केले

## लघुलेखक व लघुटंकलेखक पदासाठी माजी सैनिकांनी अर्ज करावे

धाराशिव दि.२२ डिसेंबर (जिमाका) सैनिक कल्याण विभाग,पुणे यांनी कळविले आहे की,कृषि विभाग,पुणे यांनी लघुलेखक (उच्च श्रेणी), लघुलेखक (निम्न श्रेणी) तसेच लघुटंकलेखक संवर्गातील पदे सरळसेवेने भरण्यासाठी जाहिरात प्रसिद्ध केली होती.

या भरती प्रक्रियेमध्ये माजी सैनिक प्रवर्गासाठी लघुलेखक व लघुटंकलेखक या पदांसाठी एकूण ७ पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्याने, कृषि विभाग,पुणे यांनी सैनिक कल्याण विभाग,पुणे यांच्याकडे 'ना हरकत प्रमाणपत्र' (NOC) देण्याबाबत मागणी केली आहे.

त्या अनुषंगाने जिल्ह्यातील माजी सैनिक वरील पदांसाठी पात्र व उपलब्ध असल्यास त्यांनी आपले नाव जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय,धाराशिव येथे २४ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजेपर्यंत कळवावे. असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय,धाराशिव यांनी केले आहे.

## विकासालाही निकालाचीच वाट पाहावी लागली

धाराशिव (शेख अंजुम)-धाराशिव शहरातील रस्ते व नाल्यांच्या कामांना अखेर स्थगिती उठवण्यात आली असली, तरी या निर्णयाच्या वेळेमुळे आता प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. नगरोत्थान योजनेअंतर्गत मंजूर असलेल्या शहरातील ५९ रस्ते व नाल्यांच्या कामांना दिलेली स्थगिती तब्बल अनेक महिने कायम ठेवण्यात आली आणि नगरपालिका निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर लगेचच ती उठवण्यात आल्याने, हा निर्णय विकासाचा की राजकारणाचा, असा सवाल नागरिक विचारत आहेत.

शहरातील रस्त्यांसाठी मंजूर ११७ कोटींच्या निधीबाबत आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सातत्याने पाठपुरावा केल्याचा दावा केला जात असला, तरी प्रत्यक्षात नागरिकांना खराब रस्त्यांमुळे मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागला. विशेष म्हणजे, १६ ऑक्टोबर २०२५ रोजी कार्यारंभ आदेश आणि २८ ऑक्टोबरला प्रत्यक्ष कामाची सुरुवात झाली असतानाही, अचानक कामांना स्थगिती देण्यात आली होती.

काही नागरिक व जनप्रतिनिधींच्या तक्रारींच्या आधारे जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या पत्रावरून उपमुख्यमंत्री व नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी दूरध्वनीद्वारे कामांना स्थगिती दिली होती. त्यानंतर ४ नोव्हेंबर रोजी झालेल्या बैठकीत निविदा प्रक्रिया नियमबद्ध असल्याचे स्पष्ट होऊनही, स्थगिती प्रत्यक्षात मात्र कायमच ठेवण्यात आली.

दरम्यान, २ डिसेंबर २०२५ रोजी नगरपालिका निवडणुकीचे मतदान झाले, तर २१ डिसेंबर रोजी निकाल जाहीर झाला. या निकालात ४१ नगरसेवकांपैकी २१ नगरसेवक भाजपाचे निवडून आले आणि नगराध्यक्षपदही भाजपाकडे गेले. विशेष बाब म्हणजे, निकालानंतर अवघ्या दुसऱ्याच दिवशी म्हणजे २२ डिसेंबरला रस्ते कामांवरील स्थगिती अधिकृतरीत्या उठवण्यात आली.

या घटनाक्रमामुळे, निवडणूक होईपर्यंत कामे थांबवून ठेवली गेली का? आणि राजकीय समीकरणे जुळल्यानंतरच विकासाला गती देण्यात आली का? असे प्रश्न उपस्थित होत आहेत. जर सर्व प्रक्रिया नियमबद्ध आणि पारदर्शक होती, तर स्थगिती नोव्हेंबरमध्येच का उठवली गेली नाही? नागरिकांची गैरसोय निवडणूक काळात दुर्लक्षित का राहिली, हा प्रश्न अनुत्तरित आहे.

दरम्यान, आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी आता उद्यापासून कामे सुरू होणार असल्याचे सांगितले असले, तरी महिनोन्महिने रस्त्यांवरील खड्ड्यांतून प्रवास करणाऱ्या नागरिकांना दिलासा उशिराच मिळाल्याची भावना शहरात व्यक्त होत आहे. विकास कामांवर राजकारणाची वेळ ठरते का, हा प्रश्न धाराशिवकरांच्या मनात कायम आहे.

## माजी सैनिकांच्या जमिनीविषयक प्रश्नांच्या निराकरणासाठी तालुकास्तरीय समितीचे पुनर्गठन

धाराशिव (जिमाका) तालुक्यातील आजी व माजी सैनिकांच्या जमिनीविषयक तसेच इतर अनुषंगिक प्रश्नांचे प्रभावीपणे निराकरण करण्यासाठी प्रत्येक तालुक्यात तालुकास्तरीय समितीचे पुनर्गठन करण्याबाबत शासनाने निर्देश दिले आहेत.त्यानुसार धाराशिव जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून दोन माजी सैनिकांची समिती सदस्य म्हणून नेमणूक करण्यात येणार आहे. या समितीच्या माध्यमातून आजी व माजी सैनिकांच्या जमिनीशी संबंधित अडचणी तसेच इतर प्रशासकीय बाबींवरील प्रश्न सोडविण्यात येणार असून,यासाठी पात्र माजी सैनिकांकडून नावे मागविण्यात येत आहेत. प्रत्येक तालुक्यातील इच्छुक दोन माजी सैनिकांनी समिती सदस्यपदासाठी आपले माजी सैनिक ओळखपत्र,डिस्चार्ज बुक,पी.पी.ओ. तसेच संपर्कासाठी मोबाईल क्रमांकासह जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय,धाराशिव येथे २९ डिसेंबर २०२५ पर्यंत नाव नोंदवावे.या प्रक्रियेत जास्तीत जास्त माजी सैनिकांनी सहभाग घ्यावा,असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, धाराशिव यांनी केले

## ३१२ कारवाया करुन २,७०,६०० 'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.२२ डिसेंबर रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण ३१२ कारवाया करुन २,७०,६०० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ १ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649